# महाराष्ट्र विधानपरिषद
## तिसरे अधिवेशन, २०२२

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ / पौष ९, १९४४ (शके)**

**(१) उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री**
**(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री**
**(३) उद्योग मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**
**(५) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६५**

---

### राज्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या शैक्षणिक धोरणाबाबत अभ्यास गटाने सादर केलेल्या अहवालावर कार्यवाही करण्याबाबत

**(१) * १५८६६ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक ६४७९ ला दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांक समाजाचे शैक्षणिक धोरण तयार करण्यासाठी शासनामार्फत अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली असून सदर अभ्यास गटाने राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी आवश्यक असलेल्या बाबींचा विचार करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर केला, परंतु सदर अहवालावर शासनामार्फत अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अभ्यास गटाने शासनास सादर केलेल्या अहवालावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अभ्यासगटाचा अहवाल प्राप्त झाला असून त्या अनुषंगाने काही मुद्दयांची माहिती संचालक, शिक्षण संचालनालय (योजना) यांचेकडून मागविण्यात आली आहे.
(२) अभ्यासगटाने सादर केलेल्या शिफारशींचे अवलोकन केले असता यामध्ये विद्यमान योजनांसाठी अनुदान वाढवून देणे, केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनामार्फत नवीन योजना सुरु करणे, विद्यमान मानधनात वाढ करणे, अल्पसंख्यांक संस्थांना बांधकामासाठी अनुदान देण्याची नवीन योजना सुरु करणे.

अल्पसंख्यांक शाळांना टप्पा अनुदानाऐवजी १००% अनुदान देणे, नियमात सुधारणा करणे इत्यादी स्वरुपांच्या शिफारशी केल्या आहेत.
(३) प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## अमरावती विभागातील उपसंचालक, शिक्षणाधिकारी व वेतन अधीक्षक कार्यालयांमधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२) * १५६९० डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती विभागातील उपसंचालक, शिक्षणाधिकारी व वेतन अधीक्षक कार्यालयांमध्ये कर्मचारी कमी असल्यामुळे कार्यालयीन कामकाजात मोठ्या प्रमाणात दिरंगाई होत असल्याने सदर पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले त्यानुसार अमरावती विभागातील उपसंचालक, शिक्षणाधिकारी व वेतन अधीक्षक कार्यालयांमधील पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) कर्मचारी कमी असल्याने कार्यालयीन कामकाजात दिरंगाई होत नाही. सरळसेवेच्या संवर्गातील पदभरतीची कार्यवाही सुरु असून पदोन्नतीची पदे भरण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध शिक्षक संघटनांच्या मागण्या प्रलंबित असल्याबाबत

**(३) * १५५२१ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.कपिल पाटील, श्री.अरुण लाड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.किशोर दराडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी, अंशत: अनुदानित २० आणि ४० टक्के अनुदान घेणाऱ्या शाळा, त्रुटींची पुर्तता केलेल्या अघोषित सर्व प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांना "सरसकट" हा शब्द काढून टाकणे तसेच विना तथा अंशतः अनुदानित शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयामधील शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १५ नोव्हेंबर २०११ व ४ जून २०१४ च्या शासन निर्णयातील वेतन अनुदान वितरणाचे सूत्र १०० टक्के लागू करण्यासाठी विविध शिक्षक संघटनांनी शाळांमधील शिक्षकांना सेवासंरक्षण आणि अनुदान,नियमानुसार वेतन देण्यात यावे या मागण्यांसाठी दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ पासून मुंबईच्या आझाद मैदान येथे महाआक्रोश आंदोलन सुरु केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागण्यांप्रकरणी मागील दोन महिन्यांपुर्वी मा.शालेय शिक्षणमंत्री, तसेच मा.मुख्यमंत्री महोदय यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देऊनही शासनामार्फत त्याची दखल न घेतल्यामुळे आंदोलन पुकारण्यात आल्याचे अघोषित शिक्षक महासंघ व शिक्षकांच्यावतीने सांगण्यात आले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागण्यांसंदर्भात शिक्षक समन्वय संघटनेने यापूर्वी दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ व २६ ऑगस्ट, २०१९ मध्ये देखील वेतनवाढी व अन्य मागण्यांसाठी दोन वेळा आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) सन २०२१ मध्ये शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने ३९६१ शाळांचे १०० टक्के पगाराकरीता संचालक व आयुक्त कार्यालयामार्फत सादर केलेले प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे,तसेच कायम विनाअनुदानित तत्वावर दिलेल्या मराठी माध्यमांच्या सुमारे साडेपाच हजार प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये सुमारे ६० हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत असून सदर शाळेतील तुकड्यांना २० ते ४० टक्के अनुदान दिले जाते हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार सदर शाळा/तुकड्यांना वाढीव १०० टक्के अनुदान देणेबाबत तसेच वाढीव अनुदान मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. या मागण्यांबाबत तातडीने निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांनी दिनांक २५/०८/२०२२ रोजी झालेल्या विधानमंडळातील चर्चेदरम्यान दिले आहे. या मागण्यांच्या अनुषंगाने मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखालील बैठकांमध्ये देखील याबाबत शासन स्तरावर तातडीने कार्यवाही करण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.
(३) होय.
(४) व (५) हे खरे नाही.

कायम शब्द वगळलेल्या अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/ तुकड्या व नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांना अनुदानास पात्र घोषित करण्याबाबत आयुक्त (शिक्षण), पुणे यांचे दिनांक २/२/२०२२ व दिनांक ११/११/२०२२ च्या पत्रान्वये प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदरहू अघोषित शाळांना अनुदानास पात्र घोषित करुन २० टक्के अनुदान मंजूर करणे तसेच अंशत: अनुदानित संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदानाचा पुढील टप्पा दिनांक १३/१२/२०२२ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याबाबत

**(४) * १६०३७ श्री.अंबादास दानवे, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुण लाड, श्री.अनिकेत तटकरे, ॲड.अनिल परब, श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार, श्रीमती उमा खापरे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय पोषण आहार योजनेंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना, विद्यार्थ्यांकरीता उपस्थिती वाढावी, गळती कमी व्हावी व सकस आहार मिळावा म्हणून माध्यान्ह भोजन योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषत: वाशिम, नागपूर व लातूर जिल्ह्यात या योजनेंतर्गत शाळांना तांदूळ आणि इतर धान्ये पुरविण्यात आली आहेत मात्र गेल्या सात महिन्यांपासून आहारासाठी आवश्यक असणारे इंधन, भाजीपाला, खाद्यतेलाचे अनुदान शासनाने दिले नसल्यामुळे तेथील मुख्याध्यापकांना दैनंदिन खर्च वैयक्तिकरित्या सोसावा लागत असल्याचे तसेच स्वयंपाकी व मदतनीस यांचेही गेल्या सात महिन्यांपासून मानधन देण्यात न आल्यामुळे त्यांचेवर उपासमारीची वेळ आली असल्याचे दिनांक २ ऑक्टोबर, २०२२ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतचे थकीत अनुदान शासनाने शक्यतो दिवाळीपूर्वी दयावे अन्यथा सदर योजना राबविण्यावर बहिष्कार टाकण्याबाबत अध्यक्ष, विदर्भ मुख्याध्यापक संघ व स्वयंपाकी मदतनीस संघटनांनी त्यादरम्यान शासनाचे निदर्शनास आले असून, अकोला जिल्ह्यात गत १० महिन्यांपासून शालेय पोषण आहार बंद आहे, तसेच नागपूर शहरातील शाळांमध्ये पोषण आहाराचा पुरवठा करणाऱ्या सुसंस्कार बचत गटाद्वारे शासकीय धान्याची विक्री खुल्या बाजारात करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नागपूर यांनी पुरवठादारांवर कारवाई व्हावी, अशा शिफारशीचा अहवाल पोषण आहार शिक्षण संचालनालयाला पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने मध्यान्ह भोजनासाठीचे थकीत अनुदान, स्वयंपाकी व मदतनीस यांचेही गेल्या सात महिन्यांपासूनचे थकित मानधन, अकोला जिल्ह्यात बंद असलेली शालेय पोषण आहार योजना सुरु करणे व शिक्षण संचालक कार्यालयाकडून शाळेच्या खात्यावर दरमहा निधी जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

प्रस्तुत योजनेंतर्गत राज्यातील अकोला जिल्हा वगळता इतर जिल्ह्यांना तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात आला आहे. तसेच, स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे माहे ऑक्टोंबर, २०२२ अखेरपर्यंत

मानधन अदा करण्यात आले आहे. माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत खाद्यतेलाचे अनुदान जिल्ह्यांना वितरीत करण्यात आले आहे. इंधन व भाजीपाल्याचे अनुदान तांत्रिक अडचणींमुळे माहे एप्रिल ते सप्टेंबर, २०२२ या कालावधीचे ७० टक्के अनुदान वितरीत करण्यात आले आहे व उर्वरित अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे आहे.

थकीत अनुदानाबाबत शासनास निवेदन प्राप्त झाले होते. सदर योजनेंतर्गत निधी प्राप्त झाल्यानंतर थकित अनुदान देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. अकोला जिल्ह्यात निविदा प्रक्रियेसंदर्भात झालेल्या न्यायालयीन प्रकरणामुळे योजनेची अंमलबजावणी स्थगित आहे. तसेच, नागपूर शहरातील सुसंस्कार बचत गटावर योजनेंतर्गत तांदूळाचा गैरव्यवहार केल्यामुळे त्याचे कामकाज रद्द करुन त्यांच्यावर फौजदारी कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

संबंधित संस्थेवर करण्यात आलेल्या कारवाईची माहिती शिक्षणाधिकारी, नागपूर महानगरपालिका यांनी प्राथमिक शिक्षण संचालनालयास कळवली आहे.

(५) शाळांना देय असलेले मासिक अनुदान योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून निधीप्राप्त झाल्यानंतर शाळांच्या खाती वर्ग करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन व प्रलंबित वैद्यकीय देयकांसाठी निधीची तरतूद करणेबाबत

**(५) * १५७३२ श्री.किरण सरनाईक, श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १४३७९ ला दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन करण्यासाठी दरमहा मंजुरी दिली जाते, त्याचबरोबर वैद्यकीय देयके, वरिष्ठ आणि निवड वेतनश्रेणी, सहावा वेतन आयोग, कोविड काळापासून प्रलंबित असलेल्या देयकांसाठीच्या निधीची तरतूद अद्याप केली नसल्याची बाब माहे मे २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, सदरील कर्मचाऱ्यांचे कुटुंबातील किंवा स्वतः असे बरेचशा व्यक्ती कर्करोगाने तसेच आणि गंभीर आजाराने ग्रस्त असून सदर आजारांच्या उपचारासाठी पैशांची गरज असल्याने वैद्यकीय देयके मिळत नसल्याने उपचारापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुषंगाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयकांच्या मंजुरीसाठी तसेच वरिष्ठ निवड वेतनश्रेणी थकबाकी देयके, सहाव्या वेतन आयोग थकबाकी देयके याकरीता शासनाकडून निधीची तरतूद करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) शासनाकडून निधीची तरतूद करणेबाबतची कार्यवाही नियमितपणे करण्यात येत असते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी संस्था स्तरावर शेवटच्या फेरीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती नाकारली जात असल्याबाबत

**(६) * १५२०४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.जयंत पाटील, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसुचित जाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी संस्था स्तरावरील फेरीत प्रवेश घेतल्यास त्यांना शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनांचा लाभ राज्याच्या तंत्र शिक्षण संचालनालयाकडून नाकारला जात असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया विविध फेऱ्यांच्या माध्यमातून सुरू असते प्रवेशाच्या सर्व फेऱ्या संपल्यावरही महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेल्या जागांवरील प्रवेश हे संस्था स्तरावर प्रवेशफेरीच्या अधिन राहून गुणवत्ता यादीनुसार घेतले जातात मात्र ही प्रवेश फेरी संस्था स्तरावर होत असल्याने या फेऱ्यांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसंबंधित योजनेचा लाभ नाकारला जातो त्यामुळे शासनाने संस्था स्तरावर शेवटच्या फेरीमध्ये प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गातील शिष्यवृत्तीसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याबाबत विनाविलंब निर्णय घेण्यात यावा अशी मागणीही करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मागील वर्षी एक पत्र जाहीर करुन संस्था स्तरावर होणाऱ्या प्रवेशाचे अर्ज शिष्यवृत्तीसाठी पाठविण्यात येऊ नये असे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, तद्नुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी संस्था स्तरावरील फेरीत प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गातील पात्रताधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

खाजगी विनाअुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसुचित जाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनांची अंमलबजावणी ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्याकडून

अंमलबजावणी करण्यात येते. त्यामुळे अनुसुचित जाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनांचा लाभ तंत्र शिक्षण संचालनालयाकडून नाकारण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) अंशत: खरे आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयानुसार शासकीय, शासन अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / शासकीय विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयंअर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून) मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोटयातील / संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशीत विद्यार्थ्यापैकी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचे धोरण आहे. सबब, धोरणानुसार तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येत असलेली "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व "डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" च्या लाभासाठी संस्था स्तरावरील प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करुन पाठविण्यात येऊ नये, असे तंत्र शिक्षण संचालनालयाने दिनांक १५/०३/२०२१ व दिनांक १०/०८/२०२१ च्या पत्रान्वये सर्व विभागीय कार्यालयांना कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील हुडकेश्वर पुलावरील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(७) * १५४९९ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील हुडकेश्वर रोडवर नाल्याच्या विस्तारीकरणाच्या कामाला अनेक महिने होऊनही काम पूर्ण झाले नाही तसेच सिमेंट रोड झाल्यानंतर रस्त्याचे समतल झाले नाही, त्यामुळे पिपळा चौकात खड्ड्यामुळे वाहनचालकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हुडकेश्वर पुलाच्या चौपदरीकरणाचे काम अर्धवट झाल्यामुळे रस्त्यावरील डांबर उखडून, रस्त्यामध्ये खड्डे पडून अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर शहरातील हुडकेश्वर पुलावरील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सद्य:स्थितीत मुख्य पुलाचे, १.९६ कि.मी. लांबीतील चौपदरी कॉंक्रिटीकरणाचे व कॉक्रीट गटरचे १ कि.मी. लांबीतील काम पूर्ण झाले असून पुलाचे पोच मार्ग, ९.४ कि.मी. लांबीतील डांबरीकरणाचे व १.१ कि.मी. लांबीतील कॉक्रीट गटरचे काम अपूर्ण आहे.

करारनाम्याच्या अटी व शर्ती प्रमाणे भौतिक प्रगती साध्य न केल्याने संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

रस्त्याची दुरुस्ती कंत्राटदाराकडून वेळोवेळी करण्यात आली आहे. रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(२) सदरचे काम अपूर्ण आहे, हे खरे आहे.

तथापि, रस्त्याच्या स्थीतीमुळे अपघात झाल्याची नोंद नाही.

(३) व (४) सदर रस्त्याच्या लांबीतील खड्डे संबंधित कंत्राटदारामार्फत भरुन रस्ता वाहतूकीस सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती मिळणेबाबत

**(८) * १६१३७ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मोफत शिक्षण योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमाची शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती शिक्षण शुल्क समितीच्या मान्य केलेल्या शुल्कानुसार दिली जात नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मान्यताप्राप्त अनुदानित शाळांमधील पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रत्येकी २ मुलांना नि:शुल्क शिक्षण देण्याचा शासन निर्णय मार्च, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निर्गमित केला असूनही हे शिक्षण नि:शुल्क तथा मोफत नसून ते ठराविक शासकीय दराप्रमाणे शुल्कात सवलत देण्यात आली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित शाळांमधील पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचायांच्या प्रत्येकी २ मुलांना शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या शुल्काप्रमाणे शुल्क देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक १६/०३/२०२१ नुसार विहीत दराने शैक्षणिक अर्थसहाय्य देण्याची तरतूद आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कटक मंडळ, पुणे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक व माध्यमिक शाळेतील कंत्राटी शिक्षकांच्या वेतनाबाबत

**(९) * १६२४२ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कटक मंडळ (कॅन्टोनमेंन्ट बोर्ड), पुणे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक व माध्यमिक शाळेत सन २०१३ मध्ये कंत्राटी पध्दतीवर शिक्षकांच्या नेमणुका मा.शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद पुणे यांचे मान्यतेनुसार करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे कटक मंडळातील सदर अनुदानित शाळेला राज्य शासनाकडून १०० टक्के अनुदान दिले जात असताना संबंधित शासकीय अधिकाऱ्यांच्या नियमबाहय कारभार व अनियमिततेमुळे शासनाने प्राथमिक शाळेचे अनुदान बंद केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकीकडे प्राथमिक शाळेचे अनुदान बंद करण्यात आले असताना दुसरीकडे माध्यमिक शाळेसाठी शासनाकडून अनुदान दिले जात असले तरी त्या शाळेत संबंधित शिक्षकाने कर्तव्य करण्याऐवजी त्या जागेवर दुसऱ्याच व्यक्तीस परस्पर नेमून त्याला रुपये १२००० ते १३००० इतके वेतन दिले जात आहे तसेच पुणे कॅन्टोनमेंट बोर्डातील कंत्राटी शिक्षकांना कोणत्या कायदयाप्रमाणे वेतन दिले जाते या बाबींची मा.उपसंचालक शिक्षण (माध्य.) यांचेकडून अद्याप नियमित तपासणी वा आकस्मित तपासणी करण्यात न आल्यामुळे शासनाचे करोडो रुपयांचा गैरव्यवहार करण्यात येत असल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कामगार कायदयान्वये बिगारी कामगारांना दिले जात असलेले वेतन या शिक्षकांना दिले जाते यामुळे १० वर्षे कार्यरत असलेल्या शिक्षकांवर अन्याय झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) सदर शाळांतील कंत्राटी भरती प्रक्रीया ही पुणे छावणी परिषदेच्या शाळा समितीने पारीत केलेल्या ठरावानुसार करण्यात आलेली असून या कंत्राटी शिक्षकांचे वेतन कटक मंडळाच्या स्वउत्पन्नातून दिले जाते.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कनिष्ठ महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विषयाच्या शिक्षकांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी देण्याबाबत

**(१०) * १५९४२ डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कनिष्ठ महाविद्यालयातील आय. टी. विषयांचे शिक्षक गेल्या २० वर्षांपासून विनावेतन अत्यल्प वेतनावर कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे ऑनलाईन शिक्षण मंडळ परीक्षा यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयीन आय.टी. शिक्षकांना पूर्णवेळ वेतनश्रेणी मिळणेसाठी अनुदान मिळणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील माहिती व तंत्रज्ञान विषयाच्या शिक्षकांना शासन निर्णय दिनांक ३० जानेवारी, २०२२ अन्वये, पूर्ण वेळ शिक्षकांस रुपये ५०००/- व अर्धवेळ शिक्षकांस रुपये २५००/- तर घड्याळी तासानुसार नियुक्त शिक्षकांना प्रती तास रुपये ५०/- इतक्या मानधनावर नियुक्ती करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने या शिक्षकांना मानधनाऐवजी पूर्णवेळ वेतनश्रेणीत वेतन मिळण्याबाबत अनुदान मिळावे, यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) सदर शिक्षक मानधन तत्वावर कार्यरत आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक १३/०७/२००१ व दिनांक ०५.०७२००१ अन्वये सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून इ.११ व १२ वी च्या अभ्यासक्रमात द्वितीय भाषेऐवजी किंवा ४ वैकल्पीक विषयाऐवजी माहिती तंत्रज्ञान हा विषय निवडता येतो. या विषयासाठी कोणतेही अनुदान देण्यात येत नसून प्रती विद्यार्थी रुपये १२००/- पर्यंत वार्षिक शुल्क आकरण्यास संबंधित संस्थाना अनुमती देण्यात आली होती.

शासन निर्णय, दिनांक ३१/०१/२००२ अन्वये या विषयासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकास दरमहा रुपये ५०००/-, अर्धवेळ शिक्षकास रुपये २५००/- व घड्याळी तासावर नियुक्त शिक्षकास प्रति घड्याळी तास रुपये ५०/- इतके मानधन देण्यात येते.

(४) व (५) राज्यातील उच्च माध्यमिक /कनिष्ठ महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विषयास वेतनश्रेणीनुसार अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

-----------------

## राज्यातील विविध औद्योगिक वसाहतीमधील भूखंड व जागा वाटपांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(११) * १५९६८ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योजकांनी मागणी केलेले व सरकारने मान्यता दिलेले ५२६ ते ५३६ जागा वाटपाचे प्रस्ताव अद्याप प्रतिक्षेत असून मुंबई, पुणे, कोल्हापुर, सिंधुदुर्ग, सोलापूर व नाशिक या जिल्हयांमध्ये नवीन उद्योजकांनी एमआयडीसीमध्ये जागांची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागा वाटपाचे प्रस्ताव प्रतिक्षेत असल्यामुळे ९२ हजार कोटींची गुंतवणूक थांबल्यामुळे उद्योजकांनी भरलेली २५ टक्के रक्कम परत मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अडाळी (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथील अडाळी औद्योगिक वसाहत मोपा आंतरराष्ट्रीय विमानतळापासून १५ किमी अंतरावर असल्यामुळे अनेक उद्योजक अडाळीत उद्योग उभारणीसाठी इच्छूक असून भूखंड मिळणेबाबत औद्योगिक विकास कृती समितीच्या वतीने मुख्य समन्वयक यांनी सातत्याने लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अडाळी औद्योगिक वसाहतीतील भूखंडाचे रेखांकन व पायाभूत सुविधा पूर्ण होऊन ४ वर्षाच्या कालावधीनंतरही सदर भूखंड उद्योगासाठी मिळाला नसल्यामुळे सर्वपक्षीय व बेरोजगार तरूणांना एकत्र करून संघर्ष उभा करण्याचा इशारा औद्योगिक विकास कृती समितीच्या वतीने मुख्य समन्वक यांनी दिला आहे,हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, लातूर एमआयडीसी भागात सन २०१९ पासून भूखंडासाठी १६ उद्योजकांची प्रतिक्षा यादी बाकी असताना मे.देश ॲग्रो प्रा.लिमिटेड या कंपनीला भूखंड देण्यात आला असून कंपनीचे भाग भांडवल हे रूपये सात कोटी, पन्नास हजार इतके असताना त्या कंपनीने एमआयडीसीकडे रुपये १५ कोटी २८ लाख रक्कम भूखंडासाठी भरली आहे,हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अडाळी आ ैद्योगिक वसाहतीतील भूखंड उद्योजकांना मिळणेबाबत,उद्योजकांनी मागितलेल्या प्रतिक्षेत असलेल्या जागांचे वाटप करणे तसेच देश ॲग्रो प्रा.लिमिटेड या कंपनीला भूखंड देणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने विकसीत केलेल्या औद्योगिक क्षेत्रामधील आरेखीत भूखंडाचे वाटप MIDC Disposal of Land Regulations, १९७५ मधील तरतुदीप्रमाणे तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सदस्य मंडळाच्या बैठकीत वेळोवेळी ठरावाव्दारे घेतलेल्या निर्णयानुसार करण्यात येते. त्याबाबत भूखंड वाटप समितीच्या बैठकीमध्ये ऑनलाईन सरळ पध्दतीने/ई-निविदा पध्दतीने/ प्राधान्याने भूखंड वाटपाबाबत नियमितपणे निर्णय घेण्यात येतात.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

तथापि, स्थानिक लोकांमार्फत सदर क्षेत्रामध्ये उद्योग सुरु करावेत, अशी निवेदने प्राप्त आहेत. अडाळी औद्योगिक वसाहतीतील पायाभूत सुविधांची कामे अंतिम टप्प्यात असून भूखंड वाटपाची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.
(५) हे खरे नाही.

अतिरिक्त लातूर औद्योगिक क्षेत्रात भूखंड वाटपाकरीता Online Land Allotment System व्दारे भूखंड वाटपाचे धोरण आहे. मे. देश ॲग्रो प्रा.लि. यांच्या अर्जापुर्वी भूखंड वाटपाकरीता १५ अर्ज प्राप्त आहेत. त्यापैकी ८ अर्जदारांना भूखंड वाटप समितीच्या बैठकीत भूखंड मंजूर करणेत आलेले असून ५ अर्ज रद्द करणेत आलेले आहेत. १ अर्ज Defer करणेत आलेला आहे.उर्वरित १ अर्जावर भूखंडाच्या वापरातील बदलाकरीता (MMC) कार्यवाही सुरु आहे. सदरहु कंपनीचे भागभांडवल हे साडेसात कोटी आहे व सदर कंपनीने वाटपपत्रानुसार एमआयडीसीकडे रुपये १५ कोटी अठ्ठावीस लाख रक्कम भूखंडासाठी भरली आहे.
(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अतिरिक्त ठरलेल्या पूर्णवेळ ग्रंथपालांचे समायोजन करून अर्धवेळ ग्रंथपालांची पूर्णवेळ पदी नियुक्ती करणेबाबत

**(१२) * १५४२६ श्री.कपिल पाटील : दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २० मधील प्रश्न क्रमांक ९४८७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतिरिक्त ठरलेल्या पूर्णवेळ ग्रंथपालांचे समायोजन करण्याबाबत तसेच अर्धवेळ ग्रंथपालांचे पूर्णवेळ पदी नियुक्ती करणेबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल करणेबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी शासनास सादर केला असून सदर प्रस्तावाची शासन स्तरावरील तपासणी झाली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने सदर निर्णयाच्या अनुषंगाने सद्य.स्थिती काय आणि त्यासंबंधीचा तपशील काय आहे ?

**श्री.दिपक केसरकर :** (१), (२) व (३) अर्धवेळ ग्रंथपालांचे पूर्णवेळ ग्रंथपाल पदी उन्नयन करण्याची बाब विचाराधीन असून प्राप्त उन्नयनाच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## कोल्हापूर शहरातील महानगरपालिकेच्या शाळांमधील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या साहित्यासाठीचा निधी प्रलंबित असल्याबाबत

**(१३) * १५७१३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील महानगरपालिका शाळांमधील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या साहित्यासाठी सन २०१९ पासून निधी मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दीड वर्षापासून कोल्हापूर महानगरपालिका शाळांमधील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वितरित करावयाचे रुपये साडेसहा कोटींचे अनुदान प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीचे अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

कोवीड-१९ चा प्रादुर्भावामुळे राज्यातील शाळा बंद असल्यामुळे सन २०१९-२० व सन २०२०-२१ या अर्थिक वर्षात उपक्रमांची अंमलबजावणी करणे व निधी वर्ग करणे शक्य झाले नाही.

(२) प्रकल्प मान्यता मंडळामध्ये सदरची रक्कम ही आवर्ती स्वरूपात प्राप्त होत असल्याने त्याच वर्षी ती खर्च करणे आवश्यक आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डिंगोरे (जि.पुणे) येथील आमले शिवार, मराडवाडी, आंबेदरा या आदिवासी भागाला जोडणाऱ्या पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१४) * १५२५० श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिगोरे (जि.पुणे) येथील पुष्पावती नदी तीरावरील आमले शिवार, मराडवाडी, आंबेदरा या आदिवासी भागाला जोडणाऱ्या पुलाची दुरवस्था झाली असून पुलाला मोठे तडे गेले असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर पुलाच्या दोन्ही बाजूचे कठडेदेखील तुटलेले असताना अशा धोकादायक पुलावरुन शाळेतील विद्यार्थी, ग्रामस्थ, अवजड वाहने व दुचाकीस्वार जीव मुठीत धरुन प्रवास करत आहेत, हे ही खरेआहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाचे नविन बांधकाम करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून होत आहे, हे ही खरेआहे काय,

(४) असल्यास, सदर पुलाच्या कामांकरता दोन वेळेस उदघाटन होऊनही तसेच निधी उपलब्ध असूनसुध्दा कामाला अदयापही सुरुवात झालेली नाही हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुषंगाने सदर पुलाच्या बांधकामासंदर्भात शासनाने तातडीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, तसेच याकरीता किती निधीची तरतूद केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) व (२) सदर पूल निष्कासीत करण्यात आला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) नवीन पुलाच्या बांधकामास नाबार्ड योजनेंतर्गत रुपये ३००.०० लक्ष रकमेस मंजूरी प्राप्त आहे. या कामाची निविदा निश्चित झालेली असून दिनांक ०७/०३/२०२२ रोजी कार्यारंभ आदेश देणेत आलेला आहे. सद्य:स्थितीत काम प्रगतीत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या विधी अभ्यासक्रमाच्या द्वितीय सत्राच्या परीक्षेत गतवर्षाची प्रश्नपत्रिका वितरीत केल्याबाबत

**(१५) * १५२७९ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या विधी अभ्यासक्रमाच्या द्वितीय सत्राच्या ‘कॉन्स्टिट्यूशन लॉ’ या विषयाची गेल्या वर्षीचीच प्रश्नपत्रिका वितरीत करण्यात आल्याने ऐन परीक्षेच्यावेळी प्रश्नपत्रिका काढून घेतल्याची धक्कादायक घटना दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू परिक्षेच्या वेळी कॉन्स्टिट्यूशन लॉ' या विषयाची गेल्या वर्षीचीच प्रश्नपत्रिका वितरीत करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्यापपर्यंत उक्त प्रकरणी कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी सकाळी ९.०० वाजता Prog. No. ४L००११२ L.L.B/ Gen. L.L.B. (Three Year Course) या परीक्षेची "कॉन्स्टिट्यूशन लॉ" प्रश्नपत्रिका अपलोड केल्यानंतर सदर प्रश्नपत्रिका व मे, २०२२ मधील प्रश्नपित्रका एकसारखी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे प्रश्नपत्रिकेची लिंक बंद करुन सदर प्रश्नपत्रिकेचे वाटप न करता त्याऐवजी दुसरी प्रश्नपत्रिका डाऊनलोड करुन विद्यार्थ्यांना वितरीत करावी व परीक्षेचा कालावधी ११.०० ते १.०० वा. ऐवजी १२.०० ते २.०० वाजेपर्यंत करण्यात यावा अशा सूचना सर्व महाविद्यालयांना विद्यापीठाकडून देण्यात आल्या होत्या.

उक्त प्रकरणी विद्यापीठामार्फत संबंधित प्राश्निकांकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले असून ही बाब पुढील चौकशीकरीता विद्यापीठाच्या अवैध साधन चौकशी विभागाकडे पाठविण्यात आली आहे.

-----------------

## राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पोषक तांदुळ वितरीत करण्याबाबत

**(१६) * १५७८८ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये फोर्टिफाईड तांदुळ (पोषणतत्व व गुणसंवर्धित तांदुळ) सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत दोन टप्प्यांमध्ये वितरित करण्यास मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी येणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील रुपये ६८ कोटी ९३ लाख तसेच तिसऱ्या टप्प्यातील रुपये २२१ कोटी एवढया खर्चास मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेतील त्रुटी दूर करुन या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या सूचनांनुसार व राज्य मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार शासन निर्णय, दिनांक १७/१०/२०२२ अन्वये राज्यात दोन टप्प्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत फोर्टिफाइड तांदूळ वितरत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.

(३) सदर योजना केंद्र पुरस्कृत असून, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंमलबजावणी करण्यात येत आहे. एप्रिल, २०२२ ते मार्च, २०२३ या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील आकांक्षित (Aspiration) व अतिरिक्त भार (High Burden) अशा १४ जिल्ह्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत भारतीय अन्न महामंडळाकडून प्राप्त फोर्टिफाईड तांदूळ वितरीत करण्यात येत आहे. पणन हंगाम २०२२-२३ मध्ये राज्य शासनामार्फत विकेंद्रित धान खरेदी योजनेंतर्गत खरेदी करण्यात येत असलेल्या धानाच्या भरडाईअंती प्राप्त होणारा कच्च्या तांदूळाचे फोर्टिफिकेशन करुन फोर्टिफाईड तांदूळ वितरण करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मान्यता रद्द झालेल्या किंवा कायमस्वरुपी बंद पडलेल्या शाळेतील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचे इतर शाळांमध्ये समायोजन करण्याबाबत

**(१७) * १६१७६ श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार, श्रीमती उमा खापरे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ज्या शाळांची मान्यता रद्द किंवा शाळाच कायमस्वरुपी बंद पडली त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे व कर्मचाऱ्यांचे इतर शाळांमध्ये समायोजन करण्यात येणार असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा शाळांमधील ज्या विद्यार्थ्यांचे पालक नाहीत त्यांना प्रवास खर्च म्हणून वर्षाला सहा हजार रुपये बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निर्णयामुळे ज्या विद्यार्थ्यांचे पालक आहेत अशा विद्यार्थ्यांवर अन्याय होणार असून सदर निर्णयात सुधारणा करुन सरसकट सर्व विद्यार्थ्यांना प्रवास खर्च देण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने सर्व विद्यार्थ्यांना प्रवास खर्च देण्याबाबत तसेच मान्यता रद्द झालेल्या शाळांतील विद्यार्थी व कर्मचारी यांचे समायोजन करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क कायदा, २००९ नुसार कलम ४ मधील उपकलम १ मधील खंड (क) नुसार इयत्ता १ ली ते ५ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या बालकांबाबत वस्ती १ किलोमीटर एवढ्या चालत जाण्यायोग्य अंतराच्या आत तसेच कलम ४ मधील उपकलम १ मधील खंड (ख) नुसार इयत्ता ६ वी ते ८ वी शिक्षण घेणाऱ्या बालकांबाबत वस्तीनजीकच्या ३ किलोमीटर एवढ्या चालत जाण्यायोग्य अंतराच्या आत शाळा उपलब्ध नाही. अशा राज्यातील सर्व बालकांसाठी केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा योजनेतंर्गत वाहतूक सुविधा पुरविण्यात येते.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व पालखी मार्गांचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१८) * १५९६९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५ व संत तुकाराम महाराज पालखी मार्ग राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५ जी चे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोहोल-वाखरी-खुडूस (रा.म.९६५) या एकूण ७७.८० कि.मी. लांबीपैकी ५८.३३ कि.मी. लांबी व पाटस-बारामती-इंदापूर-तोंडले (रा.म.९६५जी) एकूण १३०.२० लांबीपैकी ४९.७१ कि.मी. लांबी पूर्ण झाली असून उर्वरीत काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने सर्व पालखी मार्गाकरीता जमीन, निधी व सोई सुविधा व प्रगतीपथावर काम असलेले सदर मार्ग विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग मोहोळ-वाखरी-खुडुस टप्पा क्र.१ व २ च्या (रा.म. क्र. ९६५) एकूण लांबी ७७.८०० कि.मी. पैकी ७३.०० कि.मी. लांबी पूर्ण झाली आहे.

संत तुकाराम महाराज पालखी मार्ग पाटस-बारामती-इंदापूर-तोंडले टप्पा क्र.१, २ व ३ च्या (रा.म. क्र. ९६५-जी) एकूण लांबी १३०.२०२ पैकी ५५ कि.मी. लांबी पूर्ण झाली आहे.

राज्य शासनाचे संबंधित विभाग (महसूल, सार्वजनिक बांधकाम, कृषी, पाणीपुरवठा, विद्युत इ.) सोबत वेळोवेळी (जिल्हाधिकारी सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली) साप्ताहिक बैठका तसेच सचिव (महसूल व वने) यांचे सोबत मासिक बैठका घेऊन प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करणेस्तव सर्व स्तरावरुन प्रयत्न केले जात आहेत.
(४) संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग (रा.म.९६५) वरील मार्गावरील भुमी अधिग्रहण व ताबा देणेस, तसेच पुतळे/स्मारके/मंदिरे स्थलांतरित करणे, या कामांमुळे आजमितीला सुमारे ११ महिन्यांचा विलंब झालेला आहे.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील संपूर्ण किनारपट्टी सलग व जवळच्या मार्गाने जोडण्याच्या मागणीबाबत

**(१९) * १५७१८ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड व मालवण तालुक्याला किनारपट्टीने जोडणाऱ्या आडबंदर-आचराबंदर खाडीवर पूल तसेच आचराबंदर ते तळाशीलपर्यंत समुद्राच्या काठाने सुमारे १६ किमी लांबीच्या नवीन द्विपदरी रस्ता आणि तळाशिल ते सर्जेकोट (मिऱ्याबांदा)(ता मालवण) खाडीवर मोठा पूल उभारून सिंधुदुर्ग

जिल्ह्यातील संपूर्ण किनारपट्टी सलग व जवळच्या मार्गाने थेट गोवा राज्यापर्यंत जोडण्याबाबत सन २००१ पासून सातत्याने त्या परिसरातील ग्रामस्थांनी लोकप्रतिनिधीनी सामाजिक संस्थानी लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री कुणकेश्वर सेवा मुंबई (रजि) यांनी दिनांक १० एप्रिल २०२२ रोजी मा.पर्यटन, पर्यावरण व राज्यशिष्टाचार मंत्री यांना सविस्तर लेखी निवेदन सादर केले आहे हेही,खरे आहे काय,
(३) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड मालवण तालुक्याला किनारपट्टीने जोडणाऱ्या आडबंदर खाडीवरपूल तसेच आचराबंदर ते तळाशिलपर्यंत समुद्राचे काठाने सुमारे १६ किमी लांबीच्या नवीन द्विपदरी रस्ता आणि तळाशिल ते सर्जेकोट (मिऱ्याबांदा)(ता मालवण) खाडीवर मोठा पूल उभारून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील संपूर्ण किनारपट्टी सलग व जवळच्या मार्गाने थेट गोवा राज्यापर्यंत जोडणाऱ्या कामास विनाविलंब मंजूरी व आर्थिक तरतूद करून सदर काम काम पूर्ण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे व करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सन २०२०-२१ च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेच्यावेळी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने पत्र क्र. कपास २०२१ /प्र क्र ४५ /नि-१, दिनांक ११ ऑगस्ट २०२१ रोजीच्या पत्रान्वये कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधीना सविस्तर रित्या कळवून सकारात्मक भूमिका घेतलेली आहे, हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, सदरहू पूल तसेच जोडरस्त्यांना विनाविलंब मंजूरी देऊन आवश्यक ती तरतूद अर्थसंकल्पात करून सदरहू प्रकल्पाचे काम त्वरीत हाती घेऊन पूर्ण करण्याचे व आतापर्यंत उपेक्षित राहिलेल्या किनारपट्टीतील ग्रामस्थांना समाजाच्या स्तरावर आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.
(२) याबाबतचे निवेदन अद्याप सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्राप्त झालेले नाही.
(३) आचराबंदर व तळाशिल समुद्रकिनारी धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्यात आले आहेत.

तसेच मागणीकृत रस्त्याची जागा किनारपट्टी नियमन क्षेत्र (CRZ) च्या क्षेत्रात येत असल्याने किनारपट्टी नियमन क्षेत्र (CRZ) ची परवानगी प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करणेचे नियोजन आहे.
(४) हे खरे आहे.
(५) किनारपट्टी नियमन क्षेत्र (CRZ) ची परवानगी प्राप्त झाल्यानंतर निधी निकष व प्राधान्यानुसार सदर कामे अर्थसंकल्पात समाविष्ट करण्याचे नियोजन राहील.

-----------------

## राज्यात गुटखा व पान मसाला या पदार्थांच्या उत्पादन, विक्री आणि वाहतुकीस बंदी असतानाही कंपन्यांना विक्रीचे परवाने दिल्याबाबत

**(२०) * १५१५३ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुटखा व पान मसाला हे पदार्थ मानवी आरोग्यास अत्यंत अपायकारक असल्याने या पदार्थांच्या उत्पादन, विक्री आणि वाहतुकीस राज्य शासनाने सन २०११ पासून बंदी घातलेली असताना देखील अन्न व औषध विभागाने स्टँडर्ड फूड कॅटेगरीच्या १०० प्रकल्पांतर्गत काही कंपन्यांना या पदार्थांच्या विक्रीचे परवाने दिले असल्याची गंभीर बाब दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात गुटखा व पान मसाला या पदार्थांच्या उत्पादन, विक्री आणि वाहतुकीस बंदी असतानाही काही कंपन्यांना विक्रीची परवानगी देणाऱ्या अन्न व औषध प्रशासनाच्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे आहे.
(२) संपूर्ण देशभरात अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत अन्न व्यावसायिकांना अन्न परवाने व नोंदणीसाठी FoSCos हे एकमेव ऑनलाईन पोर्टल केंद्रीय स्तरावर उपलब्ध असून ते अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत आहे.

ऑक्टोबर, २०२० पर्यंत Food Licensing Regulatory System (FLRS) मध्ये एकूण ९९ Food category उपलब्ध होत्या. त्यानंतर ऑक्टोबर, २०२० पासून FLRS बंद झाल्यानंतर FoSCos मध्ये हे ऑनलाईन पोर्टल कार्यान्वित झाले. त्यामध्ये फूड कॅटेगरी क्रमांक १०० नव्याने निर्माण करण्यात आली. परंतु FLRSto FoSCos मध्ये data transfer होताना तांत्रिक दोष (system error)निर्माण होऊन नव्याने निर्माण करण्यात आलेल्या फूड कॅटेगरी क्र.१०० मधील सब कॅटेगरी मध्ये ऑनलाईन प्रणाली द्वारे काही परवाने सदर तांत्रिक दोषाने मंजूर झाले आहेत. माहे ऑक्टोबर, २०२२ च्या सुमारास निदर्शनास आलेल्या सदर बाबीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांनी फूड कॅटेगरी क्र.१०० अंतर्गत अशा प्रकारे मंजूर झालेले परवाने हे तात्काळ दुरुस्त (Modify)करण्यात आले आहेत.

तथापि, सदरचा तांत्रिक दोष हा यापूर्वीच अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास येताच दिनांक ०३/०३/२०२२ च्या पत्रान्वये अन्न व औषध प्रशासनातील सर्व सह आयुक्त (अन्न) यांना प्रतिबंधित अन्न पदार्थ उत्पादनासाठी त्यांचे कार्यक्षेत्रात मंजूर करण्यात आलेले अन्न परवाने/नोंदणी तात्काळ रद्द/दुरुस्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तांत्रिक दोषामुळे फूड कॅटेगरी क्रमांक १०० मधील पानमसाला या पदार्थासाठी मंजूर करण्यात आलेले एकूण ५ परवाने हे तात्काळ दुरुस्त (Modify) करण्यात आले आहेत. तसेच केंद्रीय परवाना प्राधिकारी, अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, बांद्रा (पू), मुंबई यांनी प्रतिबंधित अन्नपदार्थ उत्पादनासाठी महाराष्ट्र राज्यात त्यांचे कार्यक्षेत्रात मंजूर करण्यात आलेले अन्न परवाने/नोंदणी तात्काळ रद्द (Cancel) केलेले आहे.

तसेच अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांना दिनांक २८/०२/२०२२ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र राज्यात पान मसाल्यासाठी परवाना/नोंदणी अनावधानाने मंजूर होवू नये यासाठी खबरदारीची उपाययोजना म्हणून फूड कॅटेगरी क्र.१०० मधील सब कॅटेगरी मध्ये पान मसाला हा शब्द वगळण्यासाठी विनंती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग-वडखळ (जि.रायगड) दरम्यानच्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२१) * १५४०२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग-वडखळ रस्त्यावरील जेएसडब्ल्यु कंपनी ते वडखळ बायपास रस्त्याची दुरवस्था झाली असून सदर मार्ग हा अलिबाग-विरार कॉरीडॉरमध्ये येत असल्याचे तांत्रिक कारण देत महामार्ग प्राधिकरणासह सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुरुस्ती करण्यात येत नसल्याने सदर महामार्गावर अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खड्डेमय रस्त्यांमुळे वाहतूक कोंडी होत असून प्रवाशांसह चालकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे, तसेच खड्डेमय रस्त्यांमुळे रूग्णवाहिकेतून रूग्णांना वेळेवर उपचारासाठी ने-आण करताना अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने सदर रस्ता दुरुस्ती करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) वडखळ ते अलिबाग राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

अलिबाग वडखळ रस्त्यावरील मे.जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेड कंपनी ते धरमतर खाडीपर्यंत पावसाळयात रस्त्याची दुरवस्था झाली होती. मे.जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेड कंपनी यांच्या सी.एस.आर. फंडातून वडखळ ते धरमतर रस्त्याचे कॉंक्रिटीकरणाचे काम हाती घेतले असून सदर काम लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे.

धरमतर खाडी ते अलिबाग हा रस्ता वाहतूकीस सुस्थितीत असून पावसाळयामध्ये या रस्त्यावरील खड्डे वेळोवेळी भरण्यात आले आहेत. सद्य:स्थितीतील खड्डे भरण्यासंबंधीची कार्यवाही प्रगतीत आहे.

याच मार्गावर समांतर रेषेत अलिबाग-विरार कॉरीडॉर येत असल्याने यापूर्वी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी हाती घेतलेल्या या मार्गाच्या चौपदरीकरणाच्या डि.पी.आर. तयार करण्याचा प्रस्ताव रद्द करण्यात आला होता.या रोड सेक्शनवरील २ लेन पेव्हड शोल्डर कॉन्फिगरेशन विकसित करण्यासाठी डि.पी.आर. तयार करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागास हस्तांतर करण्यात आले आहे.

दिनांक १०/०५/२०२२ रोजी केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार वडखळ अलिबाग राष्ट्रीय महामार्ग १६६ अ हा सार्वजनिक बांधकाम विभागास सोपविण्याचे कळविले आहे व त्याप्रमाणे सदर रस्ता हस्तांतरित करण्यासाठी भारत सरकारचे प्रारुप राजपत्र तयार करुन रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांचेकडे दिनांक ०२/०६/२०२२ रोजी सादर केले आहे.

(२) वडखळ बस स्टँड ते धरमतर खाडी या रस्त्याचे कॉंक्रिटीकरणाचे काम मे.जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेड यांच्या सी.एस.आर. मार्फत करण्यात येत आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी होत असून वाहतुकीसाठी अडचणी निर्माण होतात. परंतु जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेड यांनी वळण रस्ता तयार करुन काही ठिकाणी वाहतूक सुरळीत केली आहे.

(३) वरीलप्रमाणे आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यापीठांमध्ये बॅचलर ऑफ सिव्हील सर्व्हिसेस हा पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत

**(२२) * १५६३३ अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रशासकीय सेवेमध्ये मराठी टक्का कमी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मराठी टक्का वाढण्याच्या दृष्टीकोनातून स्पर्धा परीक्षा देऊ इच्छीणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी इतर राज्यांच्या धर्तीवर बॅचलर ऑफ सिव्हील सर्व्हिसेस हा पदवी अभ्यासक्रम राज्यातील विद्यापीठांमध्ये राबविण्याबाबत तात्काळ निर्णय घेण्यात येईल असे अर्थसंकल्पीय व पावसाळी अधिवेशन २०२२ मध्ये तत्कालीन मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी सभागृहामध्ये आश्वासित केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील विद्यापीठांमध्ये बॅचलर ऑफ सिव्हील सर्व्हिसेस हा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत, उच्च दर्जाचे तज्ञ शिक्षक व मार्गदर्शक वर्ग उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन सन २०२२ मध्ये याच विषयावर नियम ९३ अन्वये उपस्थित झालेल्या सूचना क्र.५ च्या अनुषंगाने दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी झालेल्या चर्चेवेळी तत्कालीन मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी याबाबत समिती गठीत करण्यात आली असून पुढील ९० दिवसात समितीचा अहवाल प्राप्त होईल व त्यावर सकारात्मक विचार करुन अभ्यासक्रम सुरु केला जाईल असे विधान केले होते.

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या दिनांक १५/०३/२०२२ च्या आदेशान्वये अकृषी विद्यापीठे आणि त्यांच्या संलग्न महाविद्यालयांमध्ये प्रशासकीय सेवा आणि व्यक्तिमत्व विकास असा अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत सर्व समावेशक अहवाल तयार करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीचा दिनांक ३०/०४/२०२२ चा अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून शासनास प्राप्त झाला आहे. सदर अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खाजगी महाविद्यालयांमध्ये नियमबाह्य पध्दतीने व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून (एआरए) मान्यता मिळणार नसल्याबाबत

**(२३) * १५७४८ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी महाविद्यालयांमध्ये नियमबाह्य पध्दतीने व्यवस्थापन कोट्यात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून (एआरए) मान्यता मिळणार नाही असे स्पष्ट आदेश प्राधिकरणाचे सचिव आणि राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे (सीईटी सेल) आयुक्त यांनी तंत्र शिक्षण संचालनालयाचे (डीटीई) संचालक यांना दिल्याचे सप्टेंबर २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पालकांनी जागरूक राहून प्रवेश प्रक्रिया पार पाडण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, अंशत: खरे आहे.

राज्यातील खाजगी व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांमध्ये नियमबाहय पध्दतीने व्यवस्थापन कोटयातून होणाऱ्या प्रवेशितांना प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून मान्यता मिळणार नाही, असे राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी दिनांक ०७/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांना कळविले आहे.
(२) व (३) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने राज्यातील प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेशी संबंधित माहिती ज्ञात होण्यासाठी व प्रवेश प्रक्रिया पारदर्शकरित्या पार पाडण्यासाठी विद्यार्थ्यांकरीता प्रवेशाशी संबंधित विस्तृत माहिती पुस्तिका संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे. तसेच दिनांक ३०/०९/२०२२ रोजी त्यांच्या संकेतस्थळावर संस्थास्तरीय जागेच्या प्रवेशासंदर्भात सूचनाही प्रसिध्द केली आहे.

तसेच संस्थास्तरावरील प्रवेशासंदर्भात राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने दिनांक ०७/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदरची प्रक्रिया ही महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशांचे विनियमन) नियम २०१७ मधील नियमांनुसार राबविण्याबाबत तंत्र शिक्षण संचालनालयास कळविले आहे. त्यानुसार तंत्र शिक्षण संचालनालयाने सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांशी संबंधित संस्थेचे प्राचार्य/संचालक यांना वरील नमूद नियमाप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत सूचित केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधा (ता.अहेरी, जि.गडचिरोली) या गावातील एकशिक्षकी शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(२४) * १५०९८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधा (ता.अहेरी, जि.गडचिरोली) या गावातील एकशिक्षकी शाळेच्या इमारतीची अत्यंत दुरवस्था झालेली असल्याने तेथील मुख्याध्यापकांना स्वतःच्या निवासस्थानी शाळा भरवावी लागत असल्याचे माहे ऑगस्ट,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,यासंदर्भात शासनाने पाहणी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तदनुसार सदरहू शाळेच्या इमारतीची दुरुस्ती करण्याकरीता किती निधीची तरतूद केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) दरवर्षी पावसाळ्यापूर्वी गटशिक्षणाधिकारी यांचेकडून धोकादायक इमारतींची माहिती मागविण्यात येते. त्यात सिंधा (ता.अहेरी, जि.गडचिरोली) या गावातील शाळेची इमारत धोकादायक असल्याची बाब निदर्शनास आली आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता, पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, जिल्हा परिषदांकडून वर्ग खोल्यांची निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा परिषद सेस फंड, आमदार-खासदार निधी, चौदावा/ पंधरावा वित्त आयोग व सी.एस.आर. इत्यादी माध्यमांतून वर्गखोली बांधकामाची तजवीज ठेवली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.भोगवाडे (बु.) (ता.धडगाव, जि.नंदुरबार) येथील शाळेच्या इमारतीच्या दुरवस्थेबाबत

**(२५) * १५९८९ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २००७-०८ मध्ये सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मौ.भोगवाडे बु. (ता.धडगाव, जि.नंदुरबार) येथे प्राथमिक शाळेच्या एकाच वर्ग खोलीचे बांधकाम करण्यात येऊन या शाळेत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत वर्ग भरविले जात असून तेथील सर्व विद्यार्थ्यांना एकाच खोलीत दोन शिक्षक शिकवितात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर एकच खोली असलेली शाळा इमारतीच्या स्लॅबमध्ये भेगा पडून दुरवस्था झाल्यामुळे ऐन पावसाळयात वर्ग खोलीत पाणी गळती होत असून इमारत कोसळून जीवितहानी होण्याची शक्यता असल्याचे दिनांक ३ ऑगस्ट,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शाळेसाठी दोन खोल्यांची इमारत बांधण्यात यावी अशी मागणी सन २०१५ पासून तेथील स्थानिक नागरिक, विद्यार्थी तसेच मा.लोकप्रतिनिधी यांनी केलेली असताना अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, इमारतीच्या दुरवस्थामुळे तेथील शिक्षकांची तात्पुरती उपस्थिती व त्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान लक्षांत घेऊन, तेथील ग्रामस्थ नागरिक व मा.लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार भविष्यातील विद्यार्थी संख्या विचारात घेऊन दोन वर्ग खोल्यांची इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१), (२), (३) व (४) भोगावडे ता.धडगांव, जि.नंदुरबार येथील इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी च्या शाळेची सन २००७-०८ मध्ये बांधलेली एक वर्गखोली नादुरुस्त झाल्याने विद्यार्थ्यांची सुरक्षा व शैक्षणिक हीत लक्षात घेऊन सदर शाळा खाजगी इमारतीत भरविण्यात येत आहे.

जिल्हा परिषदेकडून वर्ग खोल्यांची निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा परिषद सेस फंड, आमदार-खासदार निधी, चौदावा/ पंधरावा वित्त आयोग व सी.एस.आर. इत्यादी माध्यमांतून वर्गखोली बांधकामाची तजवीज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्राचार्य पदाच्या कालमर्यादेबाबत

**(२६) * १५३४५ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्राचार्य पदाच्या नेमणूक पध्दतीमध्ये झालेल्या बदलामुळे प्राध्यापक प्राचार्य झाल्यास प्रथम ५ वर्ष व नंतरचे ५ वर्ष प्राचार्य पदी काम करतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय मुल्यांकन आणि अधिस्विकृती परिषदेच्या (नॅक) मुल्यांकनामुळे प्राचार्यांच्या जबाबदाऱ्या कित्येक पटीने वाढल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राचार्य म्हणून काम करीत असताना त्यांच्यावर सर्व महाविद्यालयाची जबाबदारी असते, त्यांना इतर कोणतेही आर्थिक लाभ मिळत नाहीत, प्राध्यापक पद ही मिळत नाही. सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे प्राचार्यांचा ग्रेड पे-१०,००० असल्याने त्यांना सातव्या वेतन आयोगात ॲकेडमिक लेव्हल १४ मध्ये निश्चिती करणे आवश्यक होते. परंतु सहयोगी प्राध्यापकाप्रमाणे ॲकेडेमिक लेव्हल १३-अ वेतन श्रेणीमध्ये केल्याने त्यांच्यावर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मद्रास विद्यापीठाचे कुलगुरु एस.पी. त्यागराजन यांच्या समितीने दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार युजीसीने प्राचार्य पदासाठी प्रथम ५ वर्ष व नंतर १० वर्षाचा विचार करावा याकरीता शासनाने युजीसीकडे काय पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करत आहे. नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन पाच वर्षातून एकदा करण्यात येते. नॅक मुल्यांकन हे व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सामूहिक जबाबदारी असते.

(३) हे अंशत: खरे आहे.

प्राचार्य हे संबंधित महाविद्यालयाचे प्रशासकीय प्रमुख असतात. या पदास विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव तसेच इतर सेवाशर्ती लागू करण्यात आलेल्या आहेत. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने सातव्या वेतन आयोगामध्ये पदवी महाविद्यालयातील प्राचार्य या पदाला अकॅडमिक लेवल १३-ए तसेच पदव्युत्तर पदवी महाविद्यालयातील प्राचार्य या पदाला अकॅडमिक लेवल १४ ही वेतनसंरचना लागू केली आहे. सदर वेतनसंरचना राज्य शासनाने राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य पदास शासन निर्णय दिनांक ०८/०३/२०१९ अन्वये लागू केली आहे. त्यानुसार प्राचार्य पदास देय असलेले वेतन व भत्ते देण्यात येतात.

(४) विद्यापीठ अनुदान आयोगाने प्राचार्य पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव व इतर सेवाशर्ती विचारात घेऊन कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाकडे संचालक, उच्च शिक्षण तसेच राज्य शासनाकडून कोणताही पत्रव्यवहार करण्यात आलेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गुंडे ग्रामपंचायत हद्दीतील भितारवाडी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्याकरीता सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२७) * १६४७६ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुंडे ग्रामपंचायत हद्दीतील भितारवाडी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्याकरीता रस्ता, पुल, साकव इ. सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नदी ओलांडून तसेच जंगलातून जावे लागत असल्याने सदर गावातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित रहात असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, गुंडे ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे आणि योग्य सुविधा मिळव्यात यासाठी सुमारे ४०० लोकसंख्या असलेल्या भितारवाडी, चाफेवाडी व कोठेवाडी या तीन गावातील पालकांनी शासनाकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर वाड्यातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या प्रवासात खंड पडून नये यादृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) विषयांकित भितारवाडी येथील ३ आणि कोठेवाडी येथील ९ अशा एकूण १२ शालेय विद्यार्थ्यांना चाफेवाडी येथील शाळेऐवजी वालशेत येथील शाळेमध्ये वर्ग करण्याची कार्यवाही संबंधित जिल्हा परिषद यांनी केली आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत सदर १२ विद्यार्थ्यांना नदी ओलांडून शाळेत जाण्याची आवश्यकता नाही.

तथापि, सदर ठिकाणी साकव बांधण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीस सादर करण्याबाबत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## शेगांव-अकोट व तेल्हारा-अकोला (जि.अकोला) यांना जोडणाऱ्या अंदुरा येथील पूर्णा नदीवर बांधण्यात आलेल्या पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(२८) * १६५८० श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगांव-अकोट व तेल्हारा-अकोला (जि.अकोला) यांना जोडणाऱ्या अंदुरा येथील पूर्णा नदीवर बांधण्यात आलेल्या ब्रिटीशकालीन पुलाला ९१ वर्षे पूर्ण झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकत्याच गांधीग्राम येथे पूर्णा नदीवरील पुलाला तडे गेल्यामुळे सदर मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली असल्याने अकोट-अकोला मार्गे अकोल्याला जाणाऱ्या बस निंबाफाटा मार्गे वळविण्यात आल्या असून गांधी ग्राम मार्ग बंद पडल्याने अंदुराकडे जाणारा पर्यायी मार्ग म्हणून वापरला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने सदर पूलाची शासनाने चौकशी करुन दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर अंदुरा येथील पूर्णा नदीवरील पुल बुडीत पुल असल्यामुळे नवीन पुलाचे बांधकाम माहे मार्च, २०२१ मध्ये मंजूर करण्यात आलेले आहे. नवीन पुलाचे पोचमार्गाकरीता आवश्यक असलेल्या जमिनीचे भूसंपादन करण्यात येत आहे व भूसंपादन पूर्ण झाल्यावर निविदा निश्चिती करुन पुलाचे बांधकाम पूर्ण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील रांजणगांवमध्ये इलेक्ट्रॉनिक वस्तू उत्पादनांचे समूह औद्योगिक केंद्र विकसित करणेबाबत

**(२९) * १६७२५ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रांजणगाव (जि.पुणे) येथील सुमारे ३०० एकर जमिनीवर ५०० कोटीची गुंतवणूक करणारा व अंदाजे २००० कोटी उत्पन्न निर्माण करण्याची क्षमता असलेला इलेक्ट्रॉनिक वस्तू उत्पादनांचे समूह औद्योगिक केंद्र विकसित केले जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांमध्ये केंद्र शासन, राज्य शासन किती रक्कमेची गुंतवणूक करणार आहेत व सदर प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्पासाठी आयएफबी कंपनीला कर्नाटक राज्यात गुंतवणुकीसाठी आग्रह असतानाही आयएफबी कंपनी महाराष्ट्रात गुंतवणूक करीत असून या कंपनीसोबत इतरही लहान मोठ्या इलेक्ट्रॉनीक कंपन्या येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकल्पामध्ये परवानगी देण्यात आलेल्या कपंनींनी या प्रकल्पात गुंतवणूक केल्यामुळे स्थानिक महिलांना १५ ते २० हजार रोजगार निर्माण होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने सदर रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकल्पामध्ये केंद्र शासनाची गुंतवणुक रुपये २०७.९८ कोटी व राज्य शासनाची (MIDC) गुंतवणूक रुपये २८४.८७ कोटी असून सदर प्रकल्प ३२ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) होय, हे खरे आहे.

मे.आयएफबी कंपनी महाराष्ट्रात रांजणगाव येथे गुंतवणूक करत असून या कंपनी सोबत इतरही लहान मोठ्या कंपन्या येणार आहेत.
(४) होय, हे खरे आहे.

मे.आयएफबी ने सादर केलेल्या प्रकल्प अहवालानुसार सुमारे १२०० रोजगार निर्माण होणार आहेत. तसेच इलेक्ट्रॉनिक वस्तू उत्पादनांचे समूह औद्योगिक केंद्र पूर्णत: विकसित झाल्यानंतर याठिकाणी मोठ्या प्रमाणात इतर लहान मोठ्या कंपन्यांकडून गुंतवणूक अपेक्षित आहे. त्यामुळे सुमारे १५ ते २० हजार लोकांना रोजगार उपलब्ध होण्याची शक्यता आहे.
(५) वरीलप्रमाणे
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्री क्षेत्र पैठण (जि.औरंगाबाद) संतपीठाच्या विविध मागण्यांबाबत

**(३०) * १६७७४ श्री.श्रीकांत भारतीय : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १२ मधील प्रश्न क्रमांक ९५१४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात संतपीठ कार्यान्वित करण्यासाठी संतपीठाशी संबंधित तज्ञ व्यक्तींची समिती गठित करण्यात आली असून सदर समितीने या संदर्भातील शिफारशी शासनास सादर केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री क्षेत्र पैठण (जि.औरंगाबाद) येथे राज्य शासनाच्या वतीने संतपीठ स्थापन केल्यानंतर त्याला लागणाऱ्या साधन सुविधा, मनुष्यबळ, अभ्यासक्रम इ. बाबींची पूर्तता करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन निर्णयाप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पालकत्वात सुरु असलेल्या या संतपीठासाठी तत्कालीन मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांकडे रुपये २३ कोटींचा प्रस्ताव सादर केला होता त्यापैकी नोव्हेंबर २०२२ पर्यंत किती निधी संतपीठास वितरित करण्यात आला आहे,

(४) असल्यास, या संतपीठातर्फे कोणत्या अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे व सद्य:स्थितीत प्रवेशित विद्यार्थी संख्या किती आहे तसेच राज्यातील २००० पेक्षा जास्त संख्या असलेल्या वारकरी शिक्षण शाळांना प्रमाणित अभ्यासक्रम तयार करून संतपीठाशी संलग्न करण्यासंबंधी व श्री क्षेत्र पैठणच्या या संतपीठास स्वायत्त संस्था म्हणून घोषित केल्यास उद्दिष्टपूर्तिस गतिमान करण्याची योजना तसेच या प्रकल्पास पूर्णवेळ संचालक व सल्लागार मंडळ नेमण्यासंबंधी शासनाची भूमिका काय आहे,
(५) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) श्री क्षेत्र पैठण येथील संतपीठाच्या साधन सुविधा, मनुष्यबळ, अभ्यासक्रम इत्यादी बाबीचे व्यवस्थापन दिनांक १७/०९/२०२१ च्या शासन निर्णयान्वये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्याकडे सोपविण्यात आले असून, आवर्ती खर्च विद्यापीठ निधीतून भागविण्यात येतो.
(४) संतपीठामार्फत राबविण्यात येणारे अभ्यासक्रम :

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ प्रवेशित विद्यार्थी संख्या | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ प्रवेशित विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्री तुकाराम गाथा ग्रंथ परिचय | ३७ | ३६ |
| २ | श्री एकनाथ भागवती ग्रंथ परिचय | ३ | ३२ |
| ३ | श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ परिचय | २२ | ४२ |
| ४ | वारकरी संप्रदाय परिचय | १२ | ४५ |
| ५ | महानुभाव संप्रदाय परिचय | १८ | १८ |
| | एकूण | ९२ | १७३ |

दिनांक १७/०९/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये संतपीठाचे व्यवस्थापन ५ वर्षाकरीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना सोपविण्यात आले आहे.

वारकरी शिक्षण शाळांना संतपीठाशी संलग्नित करण्यासंदर्भातील प्रस्ताव अप्राप्त आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे महापे, नवी मुंबई मिलेनियम बिझनेस पार्क येथील भूखंड विनानिविदा रूपा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या विकासक कंपनीस देण्यात आल्याबाबत

**(३१) * १६७८३ श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे महापे, नवी मुंबई मिलेनियम बिझनेस पार्क येथील भूखंड क्र. जनरल-३१ मोजमाप ८३७९ हा भूखंड स्थानिकांना तसेच प्रकल्पबाधित व्यक्तीस व त्यांच्या कंपनीस न देता तसेच पार्किंगसाठी राखीव असतानासुद्धा कोणतीही निविदा न मागविता रूपा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या विकासक कंपनीस, महामंळाचे संबंधित अधिकारी यांच्याशी संगनमत करून आयअी/आयटीएस या प्रयोजनाकरीता सवलतीच्या दरात भूखंड देऊन शासनाचे आर्थिक नुकसान केल्याची घटना माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्या सुमरास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी भूखंडाचे वाटप रद्द करून संबंधीतांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याची मागणी श्री.नारायण धर्मा डाऊरकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसी, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दिनांक १३/१०/२०२२ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुषंगाने उद्योग विस्ताराच्या नावाखाली कोणतीही निविदा न मागता रूपा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या विकासक कंपनीस, महामंळाचे संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

सदरचा भूखंड प्रकल्पबाधित व्यक्तींकरीता राखीव नसून बिल्डींग पार्किंगसाठी राखीव होता.महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अभियांत्रीकी विभागाच्या अहवालानुसार सदर भूखंडाचा वापर पार्किंगसाठी होत नसल्याने सदर भूखंड उद्योग विस्तारांतर्गत म.औ.वि. महामंडळाच्या नियमानुसार शुल्क आकारून वाटप करण्यात आला आहे. सदर भूखंडाचे वाटप करताना भूखंड वाटप समितीने भविष्यातील पार्किंगचा विचार करून म.औ.वि. महामंडळाकरीता १०० वाहनांसाठी पार्कींगकरीता जागा राखीव ठेवणे भूखंडधारकास बंधनकारक करण्यात आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मे.रूपा इन्फ्राटेक आणि इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली. यांना क्षेत्र ८३०७ चौ.मी. चा भूखंड उद्योग विस्तारांतर्गत म.औ.वि. महामंडळाच्या धोरणानुसार नियमोचित शुल्क आकारून वाटप करण्यात आलेला आहे. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विद्यापीठ अधिसभा/सिनेट निवडणुकीत उमेदवारीसाठीची किमान ५ वर्षांची अट रद्द करण्याबाबत

**(३२) * १६८५६ श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विद्यापीठ अधिसभा/सिनेट निवडणुकीत उमेदवारी करण्यासाठी पदवी घेऊन किमान ५ वर्षे पूर्ण झालेली असण्याची अट महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये नमूद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित अटीमुळे विद्यापीठ आणि विद्यार्थ्यांसाठी योग्यरित्या दिशात्मक आणि विद्यार्थी हिताचे कार्य करण्यासाठी सक्षम असणाऱ्या चळवळीतील उमेदवारांना या निवडणुकीपासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अट घालण्याचा कोणताही सर्वमान्य निकष संबंधित अधिनियम वा प्रस्तावनेत नसल्यामुळे सदर अट रद्द करण्याची मागणी विद्यापीठ आणि विद्यार्थ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यापीठ अधिसभा/सिनेट निवडणुकीत उमेदवारी करण्यासाठी पदवी घेऊन किमान ५ वर्षे पूर्ण झालेली असण्याची अट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) अशी कोणतीही मागणी अद्याप शासनाकडे प्राप्त नाही, त्यामुळे त्यावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील घोषित तसेच अघोषित प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांना अनुदान मंजूर करण्याबाबत

**(३३) * १५७०१ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अघोषित प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळा व तुकड्या तसेच घोषित उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांना अनुदान मंजुरीसाठी आवश्यक तरतुदींची पुरवणी मागणी मंजूर करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, वित्तमंत्री व शालेय मंत्री यांना माहे डिसेंबर, २०१९ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजी (बैठक क्र.२३५) मध्ये तात्कालीन सरकारने सहाव्या वेतन आयोगानुसार ३०४ कोटी रुपये इतक्या खर्चाची तरतूद करण्यात येईल असे म्हटले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त शाळा व तुकड्या व अतिरिक्त शाखांवरील शिक्षक शिक्षकेतर पदांना सातव्या वेतन आयोगानुसार शासन मान्यता देऊन निधी देण्याबाबत कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार, शासन निर्णय, दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ अन्वये, अनुदान पात्र प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांची यादी घोषित करण्यात आली.

तसेच, मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० च्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, यापूर्वी घोषित केलेल्या शाळांची तपासणी करुन, अनुदान पात्र ठरणाऱ्या शाळांना शासन निर्णय, दिनांक १२, १५ व २४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये दिनांक १ नोव्हेंबर, २०२० पासून अनुदान मंजूर करण्यात आले आहे. तसेच, या शासन निर्णयासोबतच्या यादीत त्रुटीमुळे अपात्र असलेल्या शाळांची त्रुटीची पूर्तता करण्यात आली असून मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १३ डिसेंबर, २०२२ रोजीच्या निर्णयानुसार, त्रुटीपूर्तता केलेल्या शाळांना अनुदानासाठी पात्र करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्यातील शिक्षक संस्थांनी बनावट आदेशाद्वारे माध्यमिक शिक्षकांच्या पदांना मान्यता दिल्याबाबत

**(३४) * १५५२५ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर, श्री.अंबादास दानवे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात टीईटी परीक्षा उत्त्तीर्ण झाल्याशिवाय शिक्षक भरती करता येत नसताना अहमदनगर जिल्ह्यतील अकोले, नगर, राहुरी व राहता तालुक्यातील चार शिक्षक संस्थेतील ३५ शिक्षकांना सन २०१७ व २०१८ मध्ये मंत्रालयातून बनावट आदेश काढून त्याआधारे माध्यमिक शिक्षणाधिकायांनी अनुदानित तत्वावर माध्यमिक शिक्षकांच्या पदांना मान्यता दिल्याची बाब माहे डिसेंबर, २०२१ व सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक पात्रता परीक्षेत (टीईटी) गैरप्रकार केलेल्या उमेदवारांची सुनावणी घेऊन वैयक्तिक मान्यता आणि मान्यता शालार्थ आयडी रद्द करण्याचे आदेश करण्याच्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालकांनी अद्यापही प्राथमिक शिक्षण संचालनालयाला सादर केले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या निर्देशानुसार संबंधित उमेदवारांवर कारवाईची प्रक्रिया सुरु करुन विभागीय शिक्षण उपसंचालकांनी संबंधित उमेदवारांची सुनावणी घेऊन वैयक्तिक मान्यता आणि शालार्थ आयडी रद्द करण्याची प्रक्रिया आठ दिवसांत पूर्ण करावयाची असूनही संबंधित अधिकारी जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहेत तसेच सदर प्रकरणी दोषी असलेल्या नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी दिनांक १५/६/२०२२ रोजी मा.शिक्षण आयुक्त, पुणे यांना निवेदन पाठवून शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक व संस्थाचालक यांच्या विरूध्द फौजदारी स्वरूपाची दंडात्मक कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने शिक्षक पात्रता परीक्षेत (टीईटी) गैरप्रकार केलेल्या उमेदवारांची सुनावणी घेऊन वैयक्तिक मान्यता आणि मान्यता शालार्थ आयडी रद्द करुन त्याचा अहवाल सादर करण्यास विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. अहमदनगर यांनी प्राप्त पत्रानुसार ३४ पदांना मान्यता दिलेल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) शिक्षण संचालक (प्राथमिक), यांनी सुनावणी घेऊन वैयक्तिक मान्यता व शालार्थ आयडी रद्द करण्याची कार्यवाही करुन ६० दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिनांक २२/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिले आहेत.

परंतु, याविरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करण्यात आलेल्या याचिका क्र. ९४८९/२०२२ व इतर अनुषंगिक याचिकांमध्ये दिनांक २०/०९/२०२२ रोजी याचिका धारकास पुढील आदेशापर्यंत सेवेतून बडतर्फ करू नये, व तोपर्यंत वेतन अदा करण्याचे मा.न्यायालयाने निर्देश दिले आहेत. तसेच, याचिका क्र. ११५२०/२०२२ व इतर याचिका प्रकरणी मा.न्यायालयाने दिनांक २९/०९/२०२२ रोजी यापुढे प्रतिकुल आदेश पारित न करण्याचे निर्देश देखील दिलेले आहेत. त्यामुळे उपरोक्त शासनपत्र दिनांक १०/०६/२०२२ अन्वये निर्देशित कारवाई सद्य:स्थितीत करता येत नाही.

शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक व संस्थाचालक यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबतची निवेदन शिक्षण आयुक्तालयास प्राप्त झालेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) येथे अन्न व औषधे प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी भेसळयुक्त साठा जप्त केल्याबाबत

**(३५) * १६५४४ श्री.अंबादास दानवे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथे अन्न व औषधे प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ५३ लाख ७७ हजार रुपयांचा भेसळयुक्त साठा जप्त केला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भेसळयुक्त साठ्यामध्ये हळद, धनीया, जलजीरा पावडर, गरम मसाला व चिकन मसाला या पदार्थांचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुजरात राज्यातून मोठ्याप्रमाणात मावा, गुटखा अश्याप्रकारे विविध पदार्थाचा भेसळयुक्त साठा येत असून पालघर व ठाणे जिल्ह्यात बंद असलेल्या कारखान्यात, अनधिकृत गोडावून व महामार्गालगत असलेल्या ढाब्यांमध्ये सदरहू साठा ठेवण्यात येत असून त्याकडे संबधीत विभागाचे अधिकारी व कर्मचारी जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जप्त करण्यात आलेल्या भेसळयुक्त पदार्थांची प्रयोगशाळेत चाचणी करण्यात आली आहे काय, प्रयोगशाळेकडून चाचणी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने भेसळयुक्त साठ्यांची चौकशी करुन कारवाई करण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्यात भरारी पथक स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) व (२) खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) यासंदर्भात अन्न व औषध प्रशासनाकडून चौकशी केली असून मे. जे. जे. सिजनिंग ॲण्ड स्पायसेस, जूचंद्र, नायगांव (पूर्व), ता.वसई, जि.पालघर या पेढीतून दिनांक ३ नोव्हेंबर, २०२२ रोजी घेण्यात आलेल्या एकूण २० अन्न नमुन्यांचे विश्लेषण अहवाल अद्याप प्राप्त झालेले नाहीत. सदरचे अहवाल प्राप्त होताच अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नुसार आवश्यक ती कारवाई घेण्यात येईल.

अन्न व औषध प्रशासनातील प्रत्येक जिल्हा कार्यालयात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगे त्या जिल्ह्यातील संबंधित पदावधीत अधिकारी तथा सहायक आयुक्त (अन्न) हे उपलब्ध अन्न सुरक्षा अधिकारी यांच्या मदतीने जप्ती/धाडी या सारख्या कारवाया तसेच भरारी पथकाप्रमाणे तपासण्या करण्याचे कामकाज करीत असतात.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डी.सी.पी.एस/एन.पी.एस. खातेधारकांना ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी मिळणेबाबत

**(३६) * १५७२९ श्री.किरण सरनाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १३११५ ला दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डी.सी.पी.एस/एन.पी.एस. खाते धारकांना ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी मिळणे बाबतची मागणी कर्मचारी सातत्याने करीत असल्याची बाब माहे मे, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मान्यताप्राप्त अंशत: अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी एकरकमी रोखीने अदा करण्याबाबत शासन निर्णय दिनांक १७ फेब्रुवारी, २०२१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासन निर्णय दिनांक १७ फेब्रुवारी, २०२१ अन्वये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगातील थकबाकी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच थकबाकीसंदर्भातील निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) शासन निर्णय दिनांक १७/२/२०२१ अन्वये सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्यात येते. सन २०२०-२१ पासून संपूर्ण देशभरात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या महामारीच्या परिस्थितीमुळे राज्यात आर्थिक टंचाई निर्माण झाल्यामुळे वेतनासाठी आवश्यक असणारा निधी मर्यादित स्वरुपात तात्पुरती व्यवस्था म्हणून वित्त विभागाकडून खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येत होता.निधीच्या उपलब्धतेनुसार थकबाकी अदा करण्याबाबत कार्यवाही नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शस्त्रास्त्र निर्मितीचे प्रशिक्षण केंद्र 'अंबाझरी' (जि.नागपूर) येथील निर्माणी परिसरात उभारण्याबाबत

**(३७) * १५४९५ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथे विदर्भ डिफेन्स इंडस्ट्रीज असोसिएशनच्या सहकार्याने (व्हीडीआयए) शासनाने सेंटर ऑफ एक्सलन्सचा प्रकल्प हाती घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यंत्र इंडिया लिमिटेड (वायआयएल) आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सहकार्याने शस्त्रास्त्र निर्मितीचे प्रशिक्षण केंद्र 'अंबाझरी' (जि.नागपूर) येथील निर्माणी परिसरात दिनांक ७ नोव्हेंबर, २०२२ रोजीपासून कार्यान्वित होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील यंत्र इंडिया लिमिटेड अंतर्गत ८ आयुध निर्माण करण्यात येणार असून भविष्यात उपरोक्त ठिकाणी सदरील प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

कौशल्य विकास व रोजगार, उद्योजकता विभाग, टाटा टेक्नोलॉजीस लिमिटेड आणि विदर्भ डिफेन्स इंडस्ट्रीयल हब यांच्यामध्ये सेंटर ऑफ एक्सलन्स उडान अंतर्गत दिनांक ११ फेब्रुवारी, २०१८ रोजी करार झाला आहे.
(२) होय, हे खरे आहे.

विदर्भ डिफेन्स इंडस्ट्रीयल हब, यंत्र इंडिया लिमिटेड (वायआयएल) यांच्या संयुक्त विद्यमाने शस्त्रास्त्र निर्मिती संबंधित अभ्यासक्रम निरंतर शिक्षण अभियानांतर्गत सुरु करण्याचा प्रस्ताव राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठास दिनांक ३ ऑक्टोबर, २०२२ रोजी सादर केला असून विदर्भ डिफेन्स इंडस्ट्रीयल हब ला ५ अभ्यासक्रम सुरु करण्यास विद्यापीठाने मान्यता प्रदान केली आहे.
(३) आयुध निर्माण करण्याविषयीचे प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही विदर्भ डिफेन्स इंडस्ट्रीयल हब यांचेकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सन २००८ नंतर १००% अनुदानावर आलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान देण्याबाबत

**(३८) * १६१६० श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सन २००८ नंतर १००% अनुदानावर आलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान दिले जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील १००% अनुदानित शाळांना समान न्याय या तत्वाप्रमाणे वेतनेतर अनुदान देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणता निर्णय व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) राज्यातील खाजगी अनुदानित शाळा चालविणाऱ्या संस्थांना शासन निर्णय, दिनांक १९/०१/२०१३ अन्वये, दिनांक १ एप्रिल, २००८ रोजी वेतन अनुदानावर असलेल्या प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सन २००८ या वर्षी पाचव्या वेतन आयोगानुसार ज्या टप्प्यावर वेतन अनुदान अनुज्ञेय होते, त्या टप्प्यावरील देय वेतन अनुदानास गोठवून त्यांच्या पाच टक्के प्रमाणे वेतनेत्तर अनुदान (४ टक्के वेतनेत्तर अनुदान व १ टक्का इमारत भाडे/ देखभाल अनुदान) दिनांक १ एप्रिल, २०१३ पासून उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार, सन २०२२-२३ या वर्षाकरीता वेतनेत्तर अनुदानासाठी रुपये ५४८१.४० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैध मापनशास्त्र यंत्रणेतील सुधारित आकृतीबंधामधील पदाचे क्षेत्रिय स्तरावर फेरवाटप करणेबाबत

**(३९) * १६८१६ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैध मापनशास्त्र या यंत्रणेचे मुख्य काम व्यावसायिक व उपयोगकर्त्याकडील वापरात असलेली वजने, मापे, वजन व मापन उपकरणे यांची पडताळणी व मुद्रांकन करणे तसेच ग्राहक हितार्थ तपासणी व आवश्यक त्या ठिकाणी कारवाई करणे ही आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैध मापनशास्त्र यंत्रणेत सहाय्यक नियंत्रक/निरीक्षक ही पदे पायाभूत संवर्ग असून त्यांना मुख्यत्वे क्षेत्रिय कामकाजच करावे लागते व सहाय्यक नियंत्रकाला निरीक्षक या पदावरुनच नाममात्र श्रेणीवाढ दिली जाते. वस्तुत: दोन्ही पदांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या समान असून सध्याच्या आकृतीबंधामध्ये दोन्हीही पदावर अन्यायच झालेला असल्याने सध्या करण्यात आलेला आकृतीबंध फक्त मुंबई, ठाणे, रायगड व पुणे हे जिल्हे व शहरे नजरेसमोर ठेऊनच केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापुर्वी साधारणपणे १९९१/९२ च्या दरम्यान यंत्रणेचा प्रथमच आकृतीबंध करण्यात आला होता व त्यावेळी सर्व संवर्गातील पदांमध्ये वाढ करण्यात आली होती. परंतु सध्याच्या आकृतीबंधामध्ये कोणत्याही संवर्गातील पदांची वाढ करण्यात आली नसल्याने कालानुरुप व बदलत्या परिस्थितीमध्ये यंत्रणेसाठी नवीन आकृतीबंध आवश्यक असल्याचे परंतु सदरचा पदाचा सुधारित आकृतीबंध पुढील किमान वीस वर्षाचा विचार करुन तयार करणे आवश्यक होते व तसे करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सुधारित आकृतीबंधाचा फेरविचार करुन नविन पदाचा सुधारित आकृतीबंधात क्षेत्रिय कामकजाचे फेर वाटप करतांना सर्व संवर्गातील अधिकाऱ्यांचा समावेश करुन वस्तूनिष्ठ, पारदर्शी पध्दतीने पदाचा सुधारित आकृतीबंध तयार करुन त्यानुसार पदामध्ये व क्षेत्रिय कामामध्ये बदल करावेत, अशी मागणी संघटनेने शासनाकडे दिनांक ३१/१०/२०२२ रोजी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले सदर निवेदनाच्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय.
(२) व (३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिनस्त कार्यालयातील पदांच्या आढाव्यास मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने दिनांक २६/११/२०२१ च्या बैठकीत मंजूरी दिली असून शासन निर्णय दिनांक १८ एप्रिल २०२२ अन्वये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा सुधारित आकृतिबंध निश्चित करण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयान्वये क्षेत्रिय कार्यालयातील कामकाजाचे स्वरुप, जबाबदारी व कामाचा व्याप इ. बाबी विचारात घेऊन विभाग/जिल्हा/तालुका स्तरावर संवर्गनिहाय पदसंख्या निश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

वैध मापन शास्त्र यंत्रणेतील क्षेत्रिय अधिकाऱ्यांची जिल्हानिहाय पदसंख्या व भौगोलिक कार्यक्षेत्र सुमारे ३० वर्षापूर्वी निश्चित करण्यात आले आहे. त्यानंतर शहरीकरणामुळे अनेक शहरांचा विस्तार झालेला असून विस्तारीत शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिक व व्यापारी आस्थापना नव्याने अस्तित्वात आल्यामुळे क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या कामाच्या व्यापामध्ये मोठ्या प्रमाणात असमानता निर्माण झाली आहे. त्यामुळे उपरोक्त सूचना विचारात घेऊन सदर असमानता कमी करण्याच्या दृष्टीने शासन निर्णय दिनांक १४/१०/२०२२ अन्वये वैध मापन शास्त्र यंत्रणेसाठी सुधारित आकृतीबंधामध्ये मंजूर केलेल्या पदांचे क्षेत्रिय स्तरावर फेरवाटप करण्यात आले आहे.

विभागाच्या सुधारीत आकृतीबंधामध्ये वैध मापन शास्त्र यंत्रणेसाठी मंजूर असलेल्या एकूण पदांच्या संख्येमध्ये कोणत्याही प्रकारची कपात करण्यात आलेली नाही. तसेच कोणत्याही पदाच्या वेतनश्रेणीत बदल करण्यात आलेले नाहीत. यास्तव, कोणत्याही संवर्गावर अन्याय होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) होय.
(५) व (६) अप्पर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील उप समिती व मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरिय सचिव समितीच्या बैठकीमध्ये चर्चा करुन विभागाचा आकृतिबंध निश्चित करण्यात आला आहे. तसेच त्यानंतर विभाग प्रमुख व शासनस्तरावर सर्वंकष चर्चा होऊन सुधारित आकृतीबंधामध्ये मंजूर पदांचे क्षेत्रिय स्तरावर फेरवाटप करण्यात आले आहे. या फेरवाटपामुळे क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या कामाच्या व्यापामधील असमानता कमी होणार असल्यामुळे वैध मापन शास्त्र यंत्रणेचे कामकाज अधिक प्रभावीपणे करण्यास मदत होणार आहे.

----------------

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रकमेत वाढ करण्याबाबत

**(४०) * १५९१२ डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून दरवर्षी इयत्ता पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'शिष्यवृत्ती परीक्षा' आयोजित करण्यात येत असून या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या पहिल्या १५ ते १६ हजार विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रक्कमेत गत १२ वर्षापासून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सरासरी वर्षाला केवळ १५० ते २५० रुपये आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना केवळ २५० ते ७०० रुपये शिष्यवृत्ती देण्यात येत असल्याची बाब दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अल्पसंख्यांक शाळातील विद्यार्थ्यांना दिली जाणारी शिष्यवृत्ती अतिशय तुटपुंजी असून शिष्यवृत्तीमध्ये अनेक वर्षापासून बदल झालेला नाही तसेच अल्पसंख्यांक संस्थांना मूलभूत सुविधांसाठी दिले जाणारे अनुदान हे देखील अतिशय अत्यल्प असून ते देखील वाढविण्याबाबत शासनाने आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुषंगाने शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत तसेच अल्पसंख्यांक शाळांमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि संस्थांना अनुदान मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांना A ते K अशी संचनिहाय वार्षिक रुपये २५०/- ते रुपये १५००/- या दराने शिष्यवृत्ती देण्यात येते.

(३) व (४) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना देणाण्यात येणारी प्रि-मॅट्रीक शिष्यवृत्ती व अल्पंख्यांक समाजाच्या संस्था/ शाळांसाठी पायाभूत विकास योजना (IDMI) या दोन योजनांचे दर हे केंद्रशासनामार्फत निर्धारीत करण्यात येत असतात. अल्पसंख्यांक शाळांना मूलभूत सोयी-सुविधांसाठी अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत अनुदान देण्यात येते. इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्याबाबतच्या प्रस्तावाची शासनस्तरावर छाननी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर-मंगळवेढा महामार्गाचे काम अपुर्णावस्थेत असल्याबाबत.

**(४१) * १५८८१ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ३६७१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर-मंगळवेढा महामार्ग क्र. १६६ या रस्त्याची कामे अपूर्णावस्थेत असतानाही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडुन सदर मार्ग वाहतुकीसाठी सुरु करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर-मंगळवेढा महामार्गावर बेगमपुर व सोहाळे गावाजवळ सर्व्हिस रस्त्याची सोय नसल्याने रस्त्यालगतच्या वसाहतीतील नागरिकांना विरुध्द दिशेने प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास अनेक ठिकाणी सर्व्हिस रस्त्यासह अपूर्णावस्थेतील कामे, दिशादर्शक फलकांचा अभाव, रस्त्याच्या ड्रेनेजच्या निकृष्ट कामामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले तदनुषंगाने संबंधित ठिकाणी सर्विस रस्ता, तसेच अपुर्णावस्थेत राहिलेली कामे पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

सोलापूर-मंगळवेढा राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

सद्य:स्थितीत सदर महामार्गाचे मुख्य रस्त्याचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे व महामार्गावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

बेगमपुर येथे सेवा रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. सोहाळे येथे डाव्या बाजुचे सेवा रस्ता पूर्ण असून उजव्या बाजुचे काही ठिकाणी भुसंपादनाची प्रक्रिया न्यायप्रविष्ट असल्याने तेथे काम करता आले नाही. भूसंपादनाची न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी काम करण्याचे नियोजन राहील.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातील सहायक शिक्षकांच्या पर्यवेक्षक पदावरील पदोन्नतीच्या वेतनश्रेणीबाबत

**(४२) * १५२६२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातील सहायक शिक्षकांना पदोन्नती मिळाल्यास त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार पर्यवेक्षक पदावरील वेतनश्रेणी देण्यात येते, सदर वेतनश्रेणी ही सहायक शिक्षकांच्या वेतनश्रेणीपेक्षा कमी असल्याने पदोन्नती मिळाल्यानंतर त्यांच्या वेतनात वाढ न होता वेतन कमी होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहायक शिक्षकांची पर्यवेक्षक पदावर पदोन्नती करताना त्यांच्या वेतनश्रेणीला संरक्षण देण्याची मागणी शिक्षक संघटनांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात कायआढळूनआले तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) अशी मागणी होत असल्याचे आढळून आलेले नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानातून धान्य वितरीत करण्यास विलंब होत असल्याबाबत

**(४३) * १५२५९ श्री.महादेव जानकर : तारांकित प्रश्न क्रमांक १३६७२ ला दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगाव (जि.पुणे) येथील सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानातून दर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात धान्य वाटप होत असून तेथे सातत्याने इंटरनेट बंद पडणे किंवा अंगठा देण्यासाठी असणारी स्वॅप मशीन बंद पडणे इ. तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे नागरिकांना धान्य वितरीत करण्यास विलंब होत असल्याने महिलांना स्वस्त धान्य दुकानासमोर ताटकळत उभे राहावे लागत असल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा पुरवठा विभागाने दर महिन्याला दहा तारखेपासून रेशन वाटप सुरु करावे याकरीता संबंधित अधिकाऱ्यांकडे पत्रव्यवहार केला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, यावर शासनाने पुढे काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे, सार्वजनिक वितरण व्यवस्थेंर्तगत AePDS (Adhar enabled Public Distribution System) प्रणाली मार्फत धान्य वितरण करण्यात येते. सदर कालावधीत भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) यांचेकडील आधार सर्व्हरमध्ये काही कालावधीकरीता Request time out error येत होता, तसेच AePDS प्रणाली Cloud सर्व्हरवर स्थलांतरीत झाल्यानंतर त्यामध्ये अन्नधान्याचे वाटप करतांना काही कालावधीसाठी तांत्रिक अडचणी येते होत्या. तथापि, सदर तांत्रिक अडचण दूर करण्यात आली असून आता धान्य वितरण सुरळीत सुरू आहे. तांत्रीक अडचणीमुळे

लाभार्थ्याला अन्नधान्य मिळाले नाही तर सदर महिन्याचे धान्य ई-पॉस मशीन मध्ये कॅरी फॉरवर्ड सुविधा उपलब्ध करुन त्यापुढील महिन्यात लाभार्थ्यांला धान्याचा लाभ देण्यात येतो. त्यानुसार लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहू नये, याबाबत काळजी घेण्यात येते.

(२) माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये भारतीय अन्नधान्य महामंडळ (FCI) यांच्या गोदामामध्ये पुरेसे प्रमाणात अन्नधान्य उपलब्ध नसल्याने धान्याची उचल होऊ शकली नाही, त्यानुसार अन्नधान्य उपलब्ध करून देणेबाबत भारतीय अन्नधान्य महामंडळासोबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालाबाबत

**(४४) * १५४२८ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १२०४४ ला दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण संचालक डॉ. धनंजय माने यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या नेट-सेट, एम.फील, कॅस, पीएचडी वेतनवाढ प्राध्यापक भरतीचा प्रश्न, तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या मानधनाबाबत यांसारख्या इतर विविध प्रश्नांसाठी संचालकांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल दिनांक २१/०२/२०२२रोजी शासनास प्राप्त झाला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे, उक्त शिफारशींपैकी कोणकोणत्या शिफारसी स्वीकारण्यात आल्या आहेत आणि त्यांच्या अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) तासिका तत्वावरील नियुक्तीच्या धोरणाचा आढावा घेऊन नवीन पर्यायी धोरणाबाबत शासनास शिफारस करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर समितीच्या शिफारशी या महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या नेट-सेट, एम. फिल, कॅस, पीएच. डी वेतनवाढ, प्राध्यापक भरतीचा प्रश्न यासंदर्भातील नाहीत. समितीने तासिका तत्वावरील अध्यापकांच्या संदर्भात शिफारशी केल्या आहेत.

(३) सदर समितीने अहवालात तासिका तत्वावरील अध्यापकांच्या बाबत प्रामुख्याने पुढील शिफारशी केलेली आहेत :-

मानधनात वाढ करणे, मानधन दरमहा थेट बँक खात्यात जमा करणे, शिल्लक कार्यभारावर तासिका तत्वावर नेमणूक देणे, तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीकरीता विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेली अर्हता धारण केली असणे, तासिका तत्वावर केलेल्या सेवेचे अनुभव प्रमाणपत्र देणे, तासिका तत्वावर नियुक्ती करण्यासाठी कालबध्द कार्यपध्दती विहित करणे, परीक्षा विषयक पर्यवेक्षणाचे व मुल्यांकनाचे कामकाज देणे, पुनर्नियुक्ती करताना नव्याने निवड कार्यपध्दती राबवू नये, प्रचलित आरक्षण धोरणानुसार तासिका तत्वावरील अध्यापकांची नियुक्ती करणे. समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक १७/१०/२०२२ अन्वये तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीकरीता कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) ते पाटण (जि.सातारा) येथील घाटमार्गाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४५) * १६२८९ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) ते पाटण(जि.सातारा) येथील घाटमार्गाचे कामाचे भूमीपूजन दि ७ मे १९९९ रोजी संपन्न झाले असून २३ वर्षाचा कालावधी झाला असूनही सदर रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याचा फायदा हा रत्नागिरी, संगमेश्वर, चिपळूण, पाटण या ४ तालुक्यातील १०० पेक्षा अधिक गावातील १५० लाख लोकसंख्येला होणार असून चिपळूण ते कुंभार्ली घाटमार्गे संगमेश्वर ते पाटण हे अंतर १२२ कि.मी. आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,संगमेश्वर-पाटण नवीन महामार्ग झाल्यास हे अंतर फक्त ४६.६०० किमी असून पाचांबे नेरदवाडी या ठिकाणाहून फक्त ३६ किमी असून यापैकी दोन्ही बाजूच्या २६.६०० किमी एकेरी रस्ता तयार असून फक्त घाटमार्गाचे २० किमी अपूर्णावस्थेत असलेले काम झाल्यास हा घाटमार्ग वाहतूकीसाठी खुला होईल त्यामुळे राज्य सरकारने याप्रकरणी गांभीर्याने दखल घेऊन सन २०२४ पर्यंत हे काम पूर्ण करावे, अशी मागणी रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री, सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री यांचेकडे येथील ग्रामस्थांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर अपूर्णावस्थेत असलेल्या कामाची सद्य:स्थिती काय आहे तसेच पूर्ण करण्यात आलेल्या कामांवर एकूण किती खर्च करण्यात आला आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, तदनुषंगाने सदर अपूर्णावस्थेत असलेले काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) निवेदन प्राप्त नाही.
(४) सदर आखणीतील २.२ कि.मी. लांबीतील रस्त्याच्या नविन बांधकामाकरीता सन १९९९-२००० मध्ये रक्कम रुपये ८०.०० लक्ष चे काम मंजूर होते. सदर कामास तरतुद उपलब्ध नसल्याने काम हाती घेण्यात आले नाही व तदनंतर सदरचे काम अर्थसंकल्पातून वगळण्यात आले.
(५) नायरी, संगमेश्वर ते चाफेर,पाटण या २० कि.मी लांबीचे घाट रस्त्याचे सविस्तर सर्वेक्षण, भूसंपादन व वन विभागाची आवश्यक परवानगी घेणे या कामास रक्कम रुपये ५०० लक्ष करीता मान्यता प्राप्त आहे. सविस्तर अंदाजपत्रक व निविदा विषयक कार्यवाही पूर्ण करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात आयपी प्रमाणित नसलेल्या औद्योगिक वापरासाठीच्या ग्लिसरीनवर बंदी घालण्याबाबत

**(४६) * १५०९० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आरोग्याच्या तक्रारींवरील औषधाच्या नावाखाली औद्योगिक वापरासाठीच्या जीवघेण्या ग्लिसरीनची सर्रास विक्री केली जात असल्याची बाब दिनांक ८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू औद्योगिक वापरासाठी असलेले ग्लिसरीन इंडियन फार्माकोपिया कमिशनद्वारे प्रमाणित करण्यात आलेले नाही, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात औषध म्हणून वापरण्यात येणाऱ्या आयपी प्रमाणित नसलेल्या औद्योगिक ग्लिसरीनवर बंदी घालण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे अंशत: खरे आहे.
ग्लिसरीनची सर्रास विक्री या मथळयाखाली दिनांक ०८/१०/२०२२ रोजी वृत्तपत्रात वृत्त प्रकाशित झाले होते.
(२) औद्योगिक वापरासाठीचे ग्लिसरीन हे "औषध" या व्याख्येत मोडत नसल्याने इंडियन फार्माकोपीया अंतर्गत प्रमाणित करण्याची आवश्यकता नाही.
(३) केंद्र शासनाच्या औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियमानुसार ग्लिसरीन व इतर द्रव्ये हे फार्माकोपीयल दर्जाचे वापरणे बंधनकारक आहे. औद्योगिक वापरासाठीचे ग्लिसरीन हे "औषध" म्हणून किंवा औषध उत्पादनात वापरता येत नाही. औषध उत्पादकांच्या तपासणी करतेवेळी उत्पादकांद्वारे वापरण्यात येणारे Excipients हे Pharmacopoieal grade आहे किंवा कसे याबाबत खात्री करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई - गोवा महामार्गावरील कोलाड-पुई (जि.रायगड) येथील पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(४७) * १५३९३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कोलाड-पुई (जि.रायगड) येथील गावानजिक असलेला महिसदरा नदीवरील ब्रिटिशकालीन पूल नादुरूस्त असल्यामुळे वाहतुकीस धोकादायक झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नादुरूस्त पुलावरून दिवसरात्र प्रवासी वाहतुकीसह अवजड, ओव्हरलोड वाहतूक होत असून सदर पूल अरूंद असल्याने वाहतुकीला वारंवार अडथळा निर्माण होत आहे तसेच सदर पूल अरुंद असल्याने पुलावर अपघातदेखील घडतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलावर मोठमोठे खड्डे पडलेले असून पुलाची खालील बाजू खचलेली आहे तर पुलाला ठिकठिकाणी तडे गेलेले असल्यामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पुलाच्या बाजूला नवीन पुलाचे काम सुमारे १० वर्षांपासून सुरू करण्यात आले असून ते काम अद्याप पूर्ण करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुषंगाने सदर नवीन पुलाचे बांधकाम गेल्या १० वर्षापासून अपुर्णावस्थेत ठेवणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच संबंधित नादुरुस्त पुलाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील रायगड जिल्ह्यातील कोलाड-पुई गावानजिक असलेल्या महिसदरा नदीवरील ब्रिटिश कालीन पूलाचे मजबूती करणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे. सदरील पूल वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने धोकादायक नाही. सदरील पुलाचे मजबूतीकरणाचे काम M/s CS Engineering Services यांच्यामार्फत करण्यात येत असून २ Span चे मजबुतीकरणाचे काम पूर्ण झाले असून तिसऱ्या Span चे काम प्रगतीपथावर आहे. M/s CS Engineering Services यांनी पुलाची सुरक्षिततेच्या दृष्टीने पुलाची तपासणी केली आहे व सद्य:स्थितीत तेथे वाहतूकीस कुठलाही धोका नसुन सदरील पूल हा वाहतुकीसाठी सुरक्षित असल्याचा त्यांनी अहवाल दिलेला आहे.

(२) कि.मी. ४२.३०० ते कि.मी/८४/६०० (कासू ते इंदापूर) या लांबीतील काँक्रिटीकरण (Rigid Pavement) करण्याच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या व हे काम मेसर्स कल्याण टोल इन्फ्रा लिमिटेड मिळाले असून लवादाच्या निर्णयानंतर २५ ऑक्टोबर, २०२२ ला कंत्राटदारास LOA देण्यात आला आहे व दिनांक १८ नोव्हेंबर २०२२ रोजी appointed date मेसर्स कल्याण टोल इन्फ्रा लिमिटेडला देण्यात आली आहे. या पूलाच्या बाजूस नवीन २ लेन पूल बांधण्यात येणार असल्यामुळे वाहतुकीला होणारा अडथळा दूर होण्यात मदत होईल.

(३) सदर पुलावरील खड्डे दुरुस्तीचे काम वारंवार करण्यात आले आहे व पूर्ण नुतणीकरणाचे काम मे.कल्याण टोल इन्फ्रा लिमिटेड यांचे मार्फत लवकरच करण्यात येईल.सदरील पुलाचे मजबुतीकरणाचे काम हे M/s C S Engineering Services यांच्यामार्फत प्रगतीपथावर आहे.
(४) होय.
(५) सदरील पूलाच्या बाजूला नवीन पुलाचे काम हे सवलतकार मेसर्स सुप्रीम पनवेल इंदापूर टोलवेज प्रा.लि. यांना दिले होते व कामातील दिरंगाईमुळे त्यांना Terminate करण्यात आले आहे.
सदरील पुलाचे मजबूतीकरणाचे काम M/s CS Engineering Services यांच्यामार्फत करण्यात येत असून २ Span चे मजबुतीकरणाचे काम पूर्ण झाले असून तिसऱ्या Span चे मजबुतीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मलठण (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील सीना नदीवर पूल बांधण्याबाबत

**(४८) * १६८२० प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलठण (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील सीना नदीवर पूल नसल्यामुळे नदीच्या वाहत्या पाण्यातून विद्यार्थी-विद्यार्थीनीं शाळेत जात असल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुडघ्यापर्यंत पाणी असलेल्या भागातून विद्यार्थी आणि ग्रामस्थ जीव धोक्यात घालून नदी पार करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नदीवर पूल होइपर्यंत फायबर बोट उपलब्ध करून देण्याबाबत तेथील ग्रामस्थांनी मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने नदीवर पूल बांधण्याबाबत तसेच पर्यायी फायबर बोट उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) व (५) सदरचा रस्ता नव्याने दर्जोन्नत झालेला आहे.सदर पूलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहिल.

-----------------

## राज्यातील लाखो विद्यार्थ्यांचे आधार कार्ड अवैध असल्याबाबत

**(४९) * १५१०४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २५ लाख ३० हजार २१८ विद्यार्थ्यांचे आधार कार्ड अवैध असल्याचे नुकतेच माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधार कार्ड अपडेटचे काम सुरु असून अदयाप ते पूर्ण झाले नसल्याने दिनांक ३१ डिसेंबर,२०२२ पर्यंत काम पूर्ण करण्याच्या सूचना शिक्षण आयुक्तांनी दिल्या आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अपडेटचे काम करतांना शिक्षक, मुख्याध्यापकांनाही अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे तसेच आधारकार्ड अपडेट नसल्याने २५ लाख विद्यार्थांना योजनांच्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

वित्त विभागाच्या दिनांक ८/०६/२०२२ च्या शासन निर्णयातील तरतूदींच्या अनुषंगाने सर्व विद्यार्थ्यांची नावे आधार कार्डशी संलग्नीकृत करण्यासाठी डिसेंबर, २०२२ पर्यंत मुदत देण्यात आली असल्याने सद्य:स्थितीत कोणत्याही विद्यार्थ्यांना योजनांच्या लाभापासून वंचित ठेवण्यात आलेले नाही.

(४) वित्त विभागाच्या दिनांक ८/०६/२०२२ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फ़त दिनांक ३०/०६/२०२२ रोजी शासन निर्णय पारित करून सर्व विद्यार्थ्यांची आधार जोडणी डिसेंबर, २०२२ अखेरपर्यंत पूर्ण करण्याची सूचना देण्यात आली आहे. त्यानुसार आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयामार्फ़त विद्यार्थ्यांच्या १००% आधार नोंदणीसाठी राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका तसेच इतर क्षेत्रिय कार्यालयांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील विधी विद्यापीठास निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(५०) * १५३७१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील विधी विद्यापीठाची स्थापना सन २०१७ मध्ये महाराष्ट्र नॅशनल लॉ कायदयाअंतर्गत झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद विधी विद्यापीठाच्या दुसऱ्या टप्प्यातील विस्तारीकरणाच्या कामासाठी रुपये २२३ कोटीची आवश्यकता असून सुध्दा शासनाने रुपये १२० कोटी देण्याची हमी देवून उर्वरित रुपये १०० कोटी विद्यापीठाने स्वबळावर उभे करावे असे विधी विद्यापीठास कळविले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद नंतर स्थापन झालेल्या मुंबई व नागपूर येथील विधी विद्यापीठास निधी दिला जातो. तर मराठवाडा सारख्या मागास भागातील विधी विद्यापीठास निधी देण्यासाठी शासन दुजाभाव करत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने औरंगाबाद विधी विद्यापीठासाठी दुसऱ्या टप्प्यातील विस्तारीकरणास आवश्यक असणारा रुपये २२३ कोटी निधी तात्काळ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, नागपूरच्या धर्तीवर निधी उभारणीसंदर्भात दिनांक ३०/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विद्यापीठास सहमती देण्यासंदर्भात कळविण्यात आले होते. परंतु दिनांक २७/१०/२०२२ च्या पत्रान्वये शासनाने उपरोक्त पत्र मागे घेतले आहे.
(३) हे खरे नाही.
महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, औरंगाबाद येथील विविध बांधकामासाठी रुपये १४९.७२ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, रुपये ९८ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) विद्यापीठाच्या दुसऱ्या टप्प्यातील बांधकामासाठी आवश्यक असणाऱ्या रुपये २२२.६३ कोटी रुपयांच्या प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी मा.मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोट तालुका सहकारी सुत गिरणी बंद पडल्याने बेरोजगार झालेल्या कामगारांना मोबदला मिळणेबाबत

**(५१) * १६५८२ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोट (ता.अकोट जि.अकोला) येथील सहकारी सुत गिरणी बंद पडल्याने ६०० कामगार बेरोजगार झाले असल्याचे माहे २ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ६०० बेरोजगार कामगारांना न्यायालयाच्या निकालानंतरही मोबदला मिळाला नसल्याने दिनांक ३ नोव्हेंबर, २०२२ रोजी शिवाजी चौक ते उपविभागीय अधिकारी कार्यालयापर्यंत कामगार परिषदेच्या समन्वय समितीने मोर्चाचे आयोजन केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने बेरोजगार कामगारांना मोबदला मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अकोट तालुका सहकारी सुतगिरणी म.अकोट ता.अकोट जि.अकोला या सूतगिरणीचे अवसायक यांना दिनांक १२/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले असून चौकशी सुरु आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म.मुंबई या बँकेनी सूतगिरणीची संपूर्ण मालमत्ता सरफेसी कायदा २००२ नुसार श्रीकृष्ण कॉटन ट्रेडर्स, अमरावती यांना रुपये १२६७.११ लाखात विक्री केली आहे. सूतगिरणीची चालू व भविष्यात निर्माण होणारी देणी देण्याची जबाबदारी बँकेने विक्रीस काढलेल्या दिनांक ०५/०१/२०२२ रोजीच्या निविदेनुसार व खरेदीदारास दिलेल्या दिनांक ०९/०९/२०२२ रोजीच्या सेल सर्टीफीकेट मधील अटी व शर्ती नुसार खरेदीदाराने स्विकारली असल्याचे बँकेच्या दिनांक १३/१२/२०२२ रोजीच्या पत्रावरुन दिसून येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांचा 'कायम' शब्द वगळून अनुदान देण्याबाबत

**(५२) * १५७२३ डॉ.रणजित पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कायम विनाअनुदान धोरण स्वीकारण्यापूर्वी व नंतर मान्यता देण्यात आलेल्या उच्च शिक्षण विभागातील महाविद्यालयांचा कायम शब्द काढण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा महाविद्यालयांची एकूण संख्या किती व त्यामध्ये कार्यरत शिक्षक कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे व उक्त सर्व महाविद्यालयांचा कायम शब्द काढण्याचा शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाविद्यालयांच्या कायम शब्द काढून टाकण्याबाबत घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार शै.व. २००१-२००२ पासून कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्याचे धोरण शासन स्तरावर अवलंबिण्यात आले असून मंत्रिमंडळाने कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्याचा धोरणात्मक निर्णय दिनांक २४/११/२००१ रोजीच्या बैठकीत घेतला आहे. दिनांक २४/११/२००१ पुर्वी कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिलेल्या नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, विषय व अतिरिक्त तुकड्यांमधील मान्य शिक्षक – शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व वेतनेत्तर अनुदान देण्यास मंजूरी देण्याच्या प्रस्तावाबाबत वित्त विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## समग्र शिक्षा योजनेतंर्गत कार्यरत करार पध्दतीवरील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(५३) * १५५४६ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समग्र शिक्षा (सर्व शिक्षा अभियान) अंतर्गत राज्यात शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई अंतर्गत विभाग, जिल्हा व तालुका स्तरावर सुमारे ६ हजार कर्मचारी सन २००३ पासून करार पध्दतीवर (कंत्राटी) अल्प मानधनावर काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्रत्येक आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात १०% वाढ सूचविण्यात आली आहे तसेच पूर्वीची सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कंत्राटी पध्दतीने मानधनावर कार्यरत कर्मचाऱ्यांना वर्षातून एकदा मानधनात वाढ दिली जात होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सर्व स्तरावर महागाईत वाढ झाली असूनसुद्धा मागील ४ वर्षात या कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने तातडीने निर्णय घेवून कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) समग्र शिक्षा या योजनेंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या मानधनाच्या दरानुसार करार तत्त्वावरील कर्मचाऱ्यांना वेतन अदा केले जाते.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीचा प्रस्ताव सादर केला असून शासन स्तरावर सदर प्रस्तावाची तपासणी सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील श्री शारदा कन्या प्रशाळेने अनुसूचित जाती व जमातीच्या मुलींकडून बेकायदेशीररित्या प्रवेश शुल्क वसूल केल्याबाबत

**(५४) * १६७३२ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील श्री शारदा कन्या प्रशाळेने अनुसूचित जाती व जमातीच्या मुलींकडून सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरीता शाळा प्रवेशावेळी प्रवेश शुल्क वसूल केले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी उक्त अनुदानित शाळेने अनुसूचित जाती व जमातीच्या मुलींकडून वसूल केलेले प्रवेश शुल्क बेकायदेशीर असल्याने वसूल केलेले प्रवेश शुल्क मुलींना परत करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षणाधिकारी यांनी आदेश देऊनही सदरहू शाळेच्या मुख्याध्यापिका व संस्थेने अद्यापी अनुसूचित जाती व जमातीच्या मुलींना प्रवेश शुल्क परत केले नसल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने शिक्षणाधिकारी यांनी आदेश देऊनही अनुसूचित जाती व जमातीच्या मुलींकडून वसूल केलेले प्रवेश शुल्क परत न करणाऱ्या श्री शारदा कन्या प्रशाळेच्या मुख्याध्यापिका व संस्थेच्या अध्यक्ष यांचेवर अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, १९८९ कलम ३ अंतर्गत गुन्हा नोंदवून कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
श्री.शारदा कन्या प्रशाला या शाळेतील अनु. जाती व जमाती संवर्गातील एकूण ५७ विद्यार्थ्यींनींचे प्रत्येकी रुपये २,३००/- प्रमाणे एकूण रुपये १,३१,१००/- एवढे शुल्क परत करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील गरीब लाभार्थींना मोफत धान्य देण्याबाबत

**(५५) * १६५६५ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील गरीब लाभार्थींना मोफत धान्य देण्याची मुदत माहे सप्टेंबर, २०२२ वरून माहे डिसेंबर,२०२२ पर्यंत वाढविण्यात आली असून या योजनेचा लाभ लाभार्थींना घेता येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मुदतवाढ देण्यात आली असली तरी अद्याप अधिकृत शासननिर्णय प्राप्त व्हायचा असल्याचे नागपूर येथील पुरवठा विभागाकडून सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने या संदर्भात सदर अधिकृत शासननिर्णय जारी करण्याबाबत तसेच मोफत धान्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे. केंद्र शासनाच्या दिनांक २९/०९/२०२२ च्या पत्रान्वये प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेस माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत मुदतवाढ दिल्याचे कळविले असून माहे ऑक्टोबर, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीसाठी अतिरिक्त अन्नधान्याचे नियतन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) दिनांक ३०/०९/२०२२ च्या शासन पत्रान्वये प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत अन्नधान्याचे जिल्हानिहाय नियतन उपलब्ध करुन देण्यात आले असून मोफत अन्नधान्याचे वितरण सुरळीत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे विभागासह अन्य विभागांत विभागीय शुल्क नियामक समिती स्थापन करण्याबाबत

**(५६) * १५९२८ डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे विभागासह अनेक विभागात गेल्या चार ते पाच महिन्यांपासून शालेय शुल्काचे नियमन करणारी विभागीय शुल्क नियामक समिती अस्तित्वात नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण शुल्काशी निगडित अनेक प्रकरणाची सुनावणी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षण शुल्क नियामक समित्या त्वरित गठीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये मिडिया अँण्ड एंटरटेनमेंट हा नवीन विषय सुरू करणेबाबत

**(५७) * १५४३२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) व्यवसाय शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर या योजनेंतर्गत मिडिया ॲण्ड एंटरटेनमेंट इयत्ता ११ वी व १२ वी साठी हा नवीन विषय सुरु करण्यासाठी परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ३९ शाळांमध्ये मिडीया ॲण्ड एंटरटेनमेंट हा तिसरा विषय सुरू करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्याबाबत दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने सदर विषय सुरु करण्याचा प्रस्ताव पाठविण्यास विलंब करणाऱ्या सबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर योजनेंतर्गत प्रस्ताव केंद्र शासनाच्या नवीन कृती आराखड्यानुसार साधारणतः दोन विषय घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार सदरील शाळांमध्ये दोन विषय यापूर्वीपासून सुरू आहेत. तिसरा विषय सुरू करण्याकरीता संबंधित शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या तसेच विषय सुरू करण्याबाबत जिल्हा स्तरावरून कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. जिल्हास्तरावरून याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास सन २०२३-२४ च्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीमध्ये विषय ठेवण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुण्यातील पिंपरी-चिंचवड मधील हॉटेलमध्ये ग्राहकांना बाटलीबंद पाण्याची सक्ती करण्यात येत असल्याबाबत

**(५८) * १५५८२ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड, पुणे येथील हॉटेलांमध्ये प्रत्येक ग्राहकाला बाटलीबंद पाण्याची सक्ती करण्यात येत असल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बाटलीबंद पाण्याची सक्ती केल्यामुळे हॉटेलला प्रत्येक पाण्याच्या बाटलीमागे रुपये ३ ते ९ कमिशन मिळत असून दररोज लाखो रुपयांची उलाढाल होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने बाटलीबंद पाण्याची सक्ती करणाऱ्या हॉटेल चालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवगड, कणकवली व मालवण हे तीन तालुके जोडणाऱ्या प्रमुख जिल्हा मार्ग क्र. ९ (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) वरील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(५९) * १६४३७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा मार्ग क्र.९ (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) हा देवगड, कणकवली व मालवण ह्या तीन तालुक्यांना जोडणारा असल्याने खारेपाटण-उंडील-ओवळ-शिरगाव-साळशी-कुवळे-सांडवे-रामगड या मार्गावरील तसेच विशेषत: शिरगाव-साळशी या रस्त्यांची दुरवस्था झालेली असून या रस्त्यांवर जागोजागी खड्डे पडलेले व साईडपट्टी खचलेल्या तसेच गटारे बुजलेली असल्याने हा रस्ता वाहतूकीस असुरक्षित बनला असून या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या एस. टी. चालक, खाजगी वाहन चालक तसेच प्रवाशांना मोठ्या प्रमाणावर अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे यामुळे मागील २ वर्षापासून त्या परिसरातील

ग्रामस्थांनी तसेच ग्रामपंचायतीनी सातत्याने कार्यकारी अभियंता, सा. बा. विभाग, कणकवली, मा.सार्वजनिक बांधकाममंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा आदींकडे लेखी निवेदनाद्वारे सदरहू रस्त्याच्या मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करून पुनर्बांधणी करण्यात यावी म्हणून मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या नूतनीकरणाबाबत शासनाकडून दुर्लक्ष झाल्यामुळे दिनांक २५ डिसेंबर २०२१ रोजी साळशी ग्रामपंचायती कार्यालयासमोर साळशी व अन्य गावातील ग्रामस्थांनी उपोषणही केलेले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने तालुक्यांना जोडणारा हा महत्वाचा व जवळचा मार्ग असल्याने या मार्गावर खाजगी तसेच एस. टी. वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरु असून बारमाही सतत वाहतूकीची वर्दळ असल्याने सदरहू संपूर्ण रस्त्याच्या नूतनीकरणाचे कामास विनाविलंब मंजूरी देवून तातडीने काम हाती घेऊन पूर्ण होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय, निवेदन प्राप्त आहे.

(२) दिनांक २५ डिसेंबर, २०२१ रोजी साळशी, ता.देवगड येथील ग्रामस्थ तसेच स्थानिक ग्रामपंचायत यांचे उपोषणाबाबतचे निवेदन प्राप्त आहे. सा.बां. विभागाचे क्षेत्रिय स्तरावरील अभियंता यांनी सदरच्या रस्त्याचे नुतनीकरण लवकर करण्यात येईल असे लेखी कळविल्यानंतर सदरचे उपोषण मागे घेण्यात आले आहे.

(३) सदर रस्त्यावर रक्कम रुपये ९८९ लक्ष च्या मंजूर कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करुन कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

सदर रस्त्यावर रक्कम रुपये १९२ लक्षची कामे प्रगतीपथावर असून मार्च, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत रस्त्यावरील खडडे भरुन रस्ता वाहतुकीकरीता सुस्थितीत ठेवण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## मुंब्रा येथील स्वस्त धान्य दुकानांमधील धान्याची गैरवाहतूक करण्यात आल्याबाबत

**(६०) * १५१५४ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा येथील स्वस्त धान्य दुकानांमध्ये तांदळाचे वितरण न करता २० टन तांदळाने भरलेले दोन टेम्पो भिवंडीला काळाबाजारात विकण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आणि उक्त प्रकरणात सहभागी असलेल्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, अशा प्रकारे स्वस्त धान्य दुकानांच्या धान्याची गैरवाहतूक करण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण** : (१) प्रस्तुत प्रकरणातील शासकीय धान्य काळ्या बाजारात जाण्यापूर्वीच वाहने ताब्यात घेऊन संबंधीतांविरुध्द कोनगाव पोलीस ठाणे, भिवंडी, जि.ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणातील दोन्ही वाहनांची मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील अन्नधान्य वाहतूकीची परवानगी रद्द करुन त्यांना कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. तसेच, सदर वाहनांवरील चालक, वाहनांचे मालक व अन्नधान्य वाहतूक कंत्राटदार संस्थेचे चेअरमन/प्रोप्रायटर यांच्याविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ व १०, महाराष्ट्र फुड ग्रेन रेशनिंग (द्वितीय) ऑर्डर, १९६६ चे कलम २३ सह महाराष्ट्र फुड ग्रेन रेशनिंग (द्वितीय) रेग्युलेशन, १९६६ चे कलम १८ (ए) अन्वये गुन्हा नोंद क्र. २३३/२०२२ अन्वये दिनांक २७/०९/२०२२ रोजी कोनगाव पोलीस ठाणे भिवंडी, जि.ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(३) शासन निर्णय दिनांक १५/०१/२०२१ अन्वये अशा प्रकरणी कारवाई करण्याबाबत संबंधीतांना निदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: रायगड जिल्हातील शेतकऱ्यांच्या भाताला हमीभावाबरोबर बोनस न मिळाल्याबाबत

**(६१) * १६४८७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०२१-२२ या वर्षी राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या भाताला हमीभावाबरोबर प्रति क्विंटल ७०० रूपये बोनस जाहीर केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यात मागील हंगामात सुमारे एकूण २५ हजार ८३२ शेतकऱ्यांकडून ५ लाख ४९ हजार २७९ क्विंटल इतका धान भातखरेदी केंद्राने खरेदी केलेला असून त्यापैकी एकाही शेतकऱ्याला शासनाकडून जाहीर झालेला बोनस देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सन २०२२-२३ या वर्षाचा शेतकऱ्यांना देण्यात येणारा बोनस अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुषंगाने शासनाने सन २०२१-२२ या वर्षीचा प्रति क्विंटल ७०० रूपये प्रमाणे शेतकऱ्यांना थकीत बोनस देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) खरीप पणन हंगाम २०२१-२२ मध्ये सर्वसाधारण धानासाठी रुपये १९४०/- आणि "अ" प्रतीच्या धानासाठी रुपये १९६०/- या हमीभावाने रायगड जिल्ह्यातील २६२६७ शेतकऱ्यांकडून ५,४६,१८०.९३ क्विंटल व रब्बी पणन हंगाम २०२१-२२ मध्ये १५६ शेतकऱ्यांकडून ३४७०.७१ क्विंटल धान खरेदी करण्यात आला आहे.

(३) व (४) धानाला प्रोत्साहनपर राशी (बोनस) देण्याचा निर्णय घेण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय, दिनांक २८/०९/२०२२ अन्वये मंत्रिमंडळ उप समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोंभळी फाटा ते कर्जत (ता.कर्जत, जि.अहमदनगर) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत

**(६२) * १६८३८ प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंभळी फाटा ते कर्जत (ता.कर्जत, जि.अहमदनगर) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ च्या तिसऱ्या सप्ताहात वा या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हायब्रीड ॲन्युटी या योजनेतून होणाऱ्या रस्त्याच्या कामाची पाहणी केली असता गुणवत्तेप्रमाणे काम न झाल्याचे तसेच कामाच्या गुणवत्तेबाबत संबंधित एजन्सी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्त्यावरील पुलाच्या पाईपखाली काँक्रीट न टाकता मातीत पाईप टाकल्याचेही निदर्शनास आले असून गुणवत्ता डावलून सदरहू एजन्सी काम करीत असल्याचे अधिकारी आणि स्वतंत्र गुणवत्ता एजन्सीच्या अभियंत्यानेही मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने संबंधित दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच सदरहू रस्त्याचे काम तातडीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

सदरचे काम हायब्रीड ॲन्युईटी प्रकल्पाच्या करारनाम्यातील अटी, शर्ती व तरतुदीप्रमाणे करण्यात येत आहे. अतिवृष्टीमुळे अल्पशा लांबीमध्ये रस्ता क्षतीग्रस्त झाला असल्याने संबंधित कंत्राटदाराकडून करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे सदर लांबी दुरूस्त करणेची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सदर काम करारनाम्यातील तरतूदी प्रमाणे भौतिक दृष्ट्या ७० टक्के पूर्ण झाले असून उर्वरित काम फेब्रुवारी, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अन्न व औषधी प्रशासन विभागाने केलेल्या गुणवत्ता चाचणीमध्ये औषधे व सौंदर्यप्रसाधनांचे नमूने सदोष आढळल्याबाबत

**(६३) * १६३११ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अन्न व औषधी प्रशासनाने दिनांक ९ फेब्रुवारी, २०११ ते ९ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत केलेल्या औषधे व सौदर्यप्रसाधनाच्या गुणवत्ता चाचणीमध्ये राज्यातील ६८६ नमूने सदोष असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील दहा वर्षात औषधांचे केवळ ४१३४ नमूने सदोष आढळले असून सदर चाचणीतील ८४ टक्के सदोष नमूने राज्याबाहेरील औषधांचे आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे अंशत: खरे आहे.
अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ९ फेब्रुवारी, २०११ ते दिनांक ९ ऑगस्ट, २०२२ या कालावधीतील औषधे व सौंदर्य प्रसाधनाच्या गुणवत्ता चाचणीमध्ये एकूण ४१३५ नमूने अप्रमाणित आहेत. त्यापैकी महाराष्ट्र राज्यातील उत्पादकांचे ६७५ नमूने आणि इतर राज्यातील उत्पादकांचे ३४६० नमूने अप्रमाणित आहेत.
(२) मागील १० वर्षात एकूण चाचणी केलेले नमूने व अप्रमाणित आढळून आलेले नमूने व टक्केवारी याबाबत तपशील खालीलप्रमाणे :-

| तपशिल | विश्लेषणार्थ घेण्यात आलेले नमूने | अप्रमाणित नमूने | अप्रमाणित नमून्यांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| एकूण नमूने | ५४६८० | ४१३५ | ७.५६% |
| महाराष्ट्र राज्यातील उत्पादकांचे नमूने | १०२९३ | ६७५ | ६.५५% |
| राज्याबाहेरील उत्पादकांचे नमूने | ४४३८७ | ३४६० | ७.७९% |

(३) शासकीय विश्लेषक यांनी नमूने अप्रमाणित घोषित केल्यानंतर त्यावर काय व कशाप्रकारे कारवाई घेण्यात यावी याबाबत केंद्र शासनाने मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली`आहेत. त्याआधारे, अन्न व औषध प्रशासनाने वेळोवेळी मार्गदर्शक तत्वे निर्गमित केले आहेत. त्यानुसार अप्रमाणित अहवालावर कारवाई घेण्यात येते.

सदर धोरणानुसार अतिगंभीर प्रकरणी आवश्यक तपास करून संबंधिताविरुध्द खटले दाखल करण्यात येतात व इतर गंभीर प्रकरणी संबंधित परवाना प्राधिकारी यांना उत्पादकांच्या विरुध्द प्रशासकीय कारवाई घेण्यासाठी कळविण्यात येते.

मागील १० वर्षात १०९१ खटले दाखल करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित तंत्रनिकेतन, औषधनिर्माणशास्त्र व वास्तूशास्त्र महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना पगारी अनुदान मिळणेबाबत

**(६४) * १५३४४ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ४५ तंत्रनिकेतने, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र महाविद्यालयात ७७५ कर्मचारी कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६ पुर्वी सदर महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०० टक्के पगारी अनुदान मिळत होते. परंतु शासनाने सन २०१६ मध्ये संस्थाना कोणतीही पुर्वसुचना न देता १० टक्के पगारी अनुदानात कपात केली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना १०० टक्के पगारी अनुदान पुर्ववत करण्यासाठी मा.तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदय यांनी दिनांक २५ ऑक्टोबर, २०२१ वा त्यासुमारास बैठक घेतली असून अद्याप सकारात्मक निर्णय झालेला नाही तसेच सदर संस्था अनुदानित असल्याने त्यांना कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याने कर्मचाऱ्यांना उर्वरित १० टक्के पगारी अनुदान देण्यास समस्या उद्‌भवत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने वरील संस्थेतील कर्मचाऱ्यांना १०० टक्के पगारी अनुदान पुर्ववत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात ९० टक्के अनुदान प्राप्त होणाऱ्या १६ तंत्रनिकेतने, ०२ अभियांत्रिकी महाविद्यालये, २४ औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व ०२ वास्तुशास्त्र महाविद्यालये अशा एकूण ४४ संस्था कार्यरत आहेत.

सदर अशासकीय अनुदानित ४४ संस्थामध्ये शिक्षक व शिक्षकेतर मिळून एकूण ११३८ कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) नाही.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक २९ ऑक्टोबर, १९७७ च्या शासन निर्णयान्वये अनुदानित संस्थांना ९०% अनुदान देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक १८ मे, १९७८ च्या शासन निर्णयान्वये अनुदानित संस्थांना अनुदान देण्याबाबत नियम व सुत्र तयार करण्यात आले असून, सुत्रानुसार जास्तीत जास्त ९०% पर्यंत अनुदान देण्यात येते व उर्वरित १०% खर्च संस्थास्तरावर करावयाचा आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सन २०१६ पासून सर्व संस्थांना वेतनासाठी एचटीई सेवार्थ प्रणाली लागू करण्यात आली असून, त्यानुसार ९० टक्के अनुदानित संस्थातील कर्मचाऱ्यांचे ९० टक्के वेतन शासन अनुदानातून व उर्वरित १० टक्के संस्थास्तरावरुन अदा करण्यात यावे, असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) सद्य:स्थितीत विभागाच्या दिनांक २९ ऑक्टोबर, १९७७ च्या शासन निर्णयान्वये अशासकीय अनुदानित संस्थांना ९०% इतके अनुदान देण्यात येत असून, या धोरणामध्ये अद्याप कोणताही बदल झालेला नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पारस-कसुरा (जि.अकोला) येथील रस्त्यांचे काम पूर्ण करण्याबाबत

**(६५) * १६७०६ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारस-कसुरा (जि.अकोला) येथील वारी मार्ग सन २०१६ मध्ये मंजूर झाला असून सदर रस्त्याचे काम संबंधित कंत्राटदाराने अद्याप हातीच घेतले नसल्याचे दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे पारस भाग-१ या तलाठी सजामधील काळीच्या शेतावर शेतामध्ये जाण्यासाठी शेतकऱ्यांना स्वातंत्र्य काळापासून पक्का रस्ता नसल्याने पावसाळ्याच्या दिवसात शेतामध्ये कामे करण्यासाठी जाता येत नसल्यामुळे जमिनी पडीक राहतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पारस-कसुरा हा वारी मार्ग असल्यामुळे वारकऱ्यांचीही गैरसोय होत असल्याने माळी युवक संघटनेमार्फत सदर रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्यात यावे, अशा आशयाचे निवेदन मा.जिल्हाधिकारी, अकोला यांना देण्यात आले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने संबंधित कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली व सदर रस्त्याचे काम तातडीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

पारस कसुरा हा रस्ता ग्रामिण मार्ग दर्जाचा आहे. सदर रस्ता हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत प्रगतीपथावरील प्रकल्पाचा भाग नाही.

(३) पारस-कसुरा ग्रामिण मार्ग पालखी मार्गाचा भाग नाही. सदर निवेदन विभागास प्राप्त नाही.
(४) सद्य:स्थितीत हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत प्रगतीपथावरील काम भौतिक दृष्ट्या ४७ टक्के पूर्ण झाले असून उर्वरित काम मार्च २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.